# मराठी

# सुलभभारती

## इयत्ता पाचवी









- **चित्रे पाहा. ळ, ळा, ळी या अक्षरांनी शेवट होणाऱ्या चित्रांची नावे लिहा.**

**उदा.**, नळ, काळा, कळी,

तुम्ही लिहिलेले शब्द पृष्ठ क्र. ४ वरील चौकटींतील अक्षरांच्या क्रमाने लिहा.




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना ळ, ळा, ळी या अक्षराने शेवट होणारे आणखी शब्द विचारावे. विद्यार्थ्यांना चित्रे ओळखण्यास सांगावे. त्यांची नावे वहीत लिहायला सांगावे.


शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१४-१५/ह/भाषा/मंजुरी/ड-५०५/७२७/दिनांक : २३/२/२०१५

# मराठी

# सुलभभारती

## इयत्ता पाचवी

(हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी.)



विद्यार्थ्याचे नाव : ____________________

शाळेचे नाव : ____________________

इयत्ता : __________ तुकडी : __________

पत्ता : ____________________

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

A3FFG8

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१५
चौथे पुनर्मुद्रण : २०१९

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती**

इरगोंडा पाटील
फादर फ्रान्सिस दिब्रिटो
वाहरू सोनवणे
प्रा. प्रज्ञा दया पवार
डॉ. सुभाष सावरकर
किशोर दरक
सविता अनिल वायळ

**मराठी भाषा समिती - कार्यगट**

| | | |
|---|---|---|
| हरी गंगाधर नारलावार | प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो | शिवा कांबळे |
| प्रा. सर्जेराव रणखांब | प्रा. डॉ. सुनीता सुळेकर | नीलेश निमकर |
| श्रीमती रेणू दांडेकर | प्राचार्य डॉ. गोविंद गायकी | एकनाथ आव्हाड |
| प्रा. जयवंत पाटील | डॉ. संध्या पवार | अतुल कुलकर्णी |
| डॉ. रोहिणी गायकवाड | श्रीकांत चौगुले | वेच्या रूध्या गावित |
| डॉ. मंदा नांदूरकर | पद्माकर कुलकर्णी | |

**संयोजन** : सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार** : राजेंद्र गिरधारी

**मुखपृष्ठ** : राजेंद्र गिरधारी

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे
मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर
निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश** :N/PB/2019-20/1,00,000

**मुद्रक** :M/s Akruti Arts, Mumbai

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

## प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने सन २००९ मध्ये राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह सर्व अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. याच धोरणानुसार,'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२' मध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी (द्वितीय भाषा) अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पाचवीचे 'मराठी सुलभभारती' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

मराठी हा विषय अनिवार्य केल्यामुळे इयत्ता पहिलीपासून मराठी विषयाची ओळख विद्यार्थ्यांना झाली आहे. इयत्ता चौथीपर्यंत श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात केली आहेत. हीच भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील गाणी, कविता, चित्रकथा, गोष्टी, अनुभव, शब्दकोडी, विनोद, सूचना, चित्रसंदेश दिले आहेत. प्रकट वाचन, मूकवाचन, अनुलेखन व श्रुतलेखन यांसाठी पाठांखाली सूचना दिल्या आहेत. पाठांशिवाय वेगळे उतारे पूरक वाचनासाठी दिले आहेत. अक्षरांपासून शब्द बनवणे व त्यांची कार्डे तयार करणे, नादमय शब्द, भाषिक खेळ, एका शब्दापासून अनेक शब्द तयार करणे, परिचित झालेल्या शब्दांचा अर्थांसह शब्दसंग्रह तयार करणे या बाबी पाठ्यपुस्तकात दिलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत भर पडेल. चार रेघांत सुलेखन कसे करावे याचेही नमुने दिलेले आहेत. नाम, क्रियापद, विरुद्धार्थी शब्द, विरामचिन्हे यांची ओळख सोप्या भाषेत करून दिली आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पाठ्यपुस्तक तयार करताना मराठी भाषा समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री. इरगोंडा पाटील यांनी मराठी भाषा समितीच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारून मोलाचे मार्गदर्शन केले. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील प्राथमिक शिक्षक, भाषातज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. श्रीमती उमा विसुभाऊ बापट व श्री. शिवाजी तांबे या निमंत्रित तज्ज्ञांचेही सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : ५ मार्च २०१५
भारतीय सौर १४ फाल्गुन, १९३६

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# इयत्ता पाचवी – मराठी सुलभभारती अध्ययन निष्पत्ती

<table>
<tr><th>अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया</th><th>अध्ययन निष्पत्ती</th></tr>
<tr><td>

**सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) वैयक्तिक, गटात कार्य करण्याची संधी आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी –**

<ul>
<li>विविध विषय, परिस्थिती, घटना, अनुभव, कथा, कविता इत्यादी स्वत:च्या पद्धतीने आणि मराठी भाषेत (तोंडी/सांकेतिक स्वरूपात) सांगणे, प्रश्न विचारणे, टिपण करणे, आपले मत देणे यांसाठीचे स्वातंत्र्य दिले जावे.</li>
<li>ग्रंथालय/वर्गात वेगवेगळ्या प्रकारच्या कथा, कविता, अथवा बालसाहित्य, स्तरांनुसार इतर साहित्य, जाहिरात फलक, वर्तमानपत्र यांतील कात्रणे उपलब्ध असावीत आणि यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.</li>
<li>वेगवेगळ्या कथा, कविता, फलक इत्यादींना संदर्भानुसार वाचून समजणे-समजावणे, यांसाठी संधी दिल्या जाव्यात.</li>
<li>ऐकलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या गोष्टी आपल्या पद्धतीने मराठी भाषेत लिहिण्याच्या संधी दिल्या जाव्यात.</li>
<li>आवश्यकतेनुसार आणि संदर्भानुसार मराठी भाषा समजून घेण्याची (नवीन शब्द/वाक्य इत्यादी) आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.</li>
<li>एकमेकांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकणे, पुस्तकातील गोष्टी वाचणे आणि त्यावर आपले मत देणे, त्यात आपल्या विचारांची भर घालून विविध प्रकारे लिहिण्याची संधी दिली जावी.</li>
<li>आजूबाजूला घडणाऱ्या क्रिया/घटना विचारात घेऊन प्रश्न विचारणे, मुलांशी चर्चा करणे, टिपण तयार करणे, मत देणे यासारख्या संधी उपलब्ध करून द्याव्या.</li>
<li>आशयाच्या संदर्भाने वापरल्या जाणाऱ्या भाषेचे बारकावे आणि नियमबद्ध मांडणी समजून घेण्याची आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.</li>
<li>नवीन शब्द चित्र-शब्दकोश/शब्दकोश यातून पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.</li>
<li>इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (उदा. गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला इत्यादी) येणारे शब्द समजणे आणि त्यांचा संदर्भानुसार वापर करण्याची संधी दिली जावी.</li>
<li>पाठ्यपुस्तक आणि त्याच्याशी संबंधित इतर साहित्यांत आलेल्या नैसर्गिक, सामाजिक आणि इतर संवेदनशील मुद्द्यांना समजून घेऊन त्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.</li>
</ul>
</td><td>

**अध्ययनार्थी –**

05.16.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी, साहसी, सामाजिक विषयांवरील कथा, कविता इत्यादी) विषय, घटना, चित्रं, पात्रं व शीर्षक यांबाबत चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपले मत देतात, तर्क करतात व निष्कर्ष काढतात.<br>
05.16.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग, घटना इत्यादींचे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यांवर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात, प्रश्न विचारतात.<br>
05.16.03 भाषेच्या सूक्ष्म निरीक्षणातून स्वत:ची मौखिक भाषा तयार करतात.<br>
05.16.04 विविध प्रकारच्या साहित्यातील (उदा. वर्तमानपत्रे, बालसाहित्य, पोस्टर इत्यादींमधील) संवेदनशील मुद्द्यांवर आपले मत/विचार व्यक्त करतात. उदा. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' हा पाठ वाचून मुले म्हणतात, 'आम्ही नेहमीच इतरांना मदत करतो.'<br>
05.16.05 भिन्न परिस्थिती आणि उद्देशांसाठी (फलकावरील सूचना, कार्यअहवाल, माहिती मिळवण्यासाठी) वाचतात.<br>
05.16.06 आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य (वर्तमानपत्रे, बालसाहित्य, मोठे फलक इत्यादी) समजून घेऊन वाचन करतात, त्यांविषयी बोलतात.<br>
05.16.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशामधून शोधतात.<br>
05.16.08 भाषेतील बारकावे, नियम इत्यादींचा विचार करून स्वत:ची भाषा तयार करतात आणि त्याचा आपल्या लेखनात/ब्रेल लिपीत समावेश करतात.<br>
05.16.09 भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक (उदा. विरामचिन्हे, क्रियापद, लिंग, वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.<br>
05.16.10 भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा (उदा. पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह) जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.<br>
05.16.11 स्तरांनुसार इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला इत्यादींमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.<br>
05.16.12 आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांबाबत तोंडी स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात.<br>
05.16.13 पाठ्यपुस्तक आणि इतर लेखनप्रकारांतील संवेदनशील विषयावर तोंडी स्वरूपात अभिव्यक्त होतात.<br>
05.16.14 आपल्या कल्पनेने कथा, कविता, पत्र कथन करतात.
</td></tr>
</table>

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | नाच रे मोरा (गाणे) – ग. दि. माडगूळकर | १ |
| २. | हत्तीचे चातुर्य (चित्रकथा) | २ |
| ३. | खेळूया शब्दांशी | ४ |
| ४. | ही पिसे कोणाची ? | ५ |
| ५. | डराव डराव! (कविता) – ग. ह. पाटील | ७ |
| ६. | ऐकूया. खेळूया. | ९ |
| ७. | खेळत खेळत वाचूया! | १० |
| ८. | कोणापासून काय घ्यावे ? (कविता) – निलम माणगावे | ११ |
| ९. | सिंह आणि बेडूक (चित्रकथा) – मुकुंद तळवलकर | १२ |
| १०. | बैलपोळा (कविता) – धोंडीरामसिंह राजपूत | १४ |
| ११. | इंधनबचत | १६ |
| १२. | बोलावे कसे ? | १८ |
| १३. | अनुभव – १ | २१ |
| १४. | चित्रसंदेश | २४ |
| १५. | नदीचे गाणे (कविता) – वि. म. कुलकर्णी | २५ |
| १६. | मी नदी बोलते... | २७ |
| १७. | आमची सहल | ३० |
| १८. | पैशांचे व्यवहार | ३२ |
| १९. | अनुभव – २ | ३४ |
| २०. | गमतीदार पत्र | ३६ |
| २१. | छोटेसे बहीणभाऊ (कविता) – वसंत बापट | ३८ |
| २२. | वाचूया. लिहूया. | ३९ |
| २३. | प्रामाणिक इस्त्रीवाला | ४१ |
| २४. | ऐका. पाहा. करा. | ४४ |
| २५. | मालतीची चतुराई | ४६ |
| २६. | पतंग (कविता) – अ. ज्ञा. पुराणिक | ४९ |
| २७. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे – डॉ. भि. ना. दहातोंडे | ५१ |
| २८. | फुलपाखरू आणि मधमाशी – बाळ गाडगीळ | ५३ |

# १. नाच रे मोरा

A3PBHV

* ऐका. म्हणा.

नाच रे मोरा, आंब्याच्या वनात
नाच रे मोरा नाच!

ढगांशी वारा झुंजला रे
काळा काळा कापूस पिंजला रे
आता तुझी पाळी
वीज देते टाळी
फुलव पिसारा नाच ।। १ ।।

झर झर धार झरली रे
झाडांची भिजली इरली रे
पावसात न्हाऊ
काहीतरी गाऊ
करून पुकारा नाच ।। २ ।।

थेंब थेंब तळ्यात नाचती रे
टपटप् पानात वाजती रे
पावसाच्या रेघात
खेळ खेळू दोघांत
निळ्या सौंगड्या नाच ।। ३ ।।

पावसाची रिमझिम थांबली रे
तुझी माझी जोडी जमली रे
आभाळात छान छान
सात रंगी कमान
कमानीखाली त्या नाच ।। ४ ।।

**– ग. दि. माडगूळकर**



**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. शक्य असल्यास या गाण्याची ध्वनिफीत ऐकवावी. गाण्याची एक-एक ओळ म्हणावी व विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी. नंतर स्वत:बरोबर, गटात तसेच वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात म्हणण्यास सांगावे.

# २. हत्तीचे चातुर्य

A3Y7JI


- पाहा. ऐका. वाचा.



मुले


फुटबॉल


ससे


खड्‌डा


फळी


हत्ती

- पाहा. सांगा.

















६

## स्वाध्याय

प्र. १. सुरुवातीला दिलेल्या चित्रांखालील नावे सांगा.

प्र. २. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांगा.

प्र. ३. चित्रे पाहा. कोण ते सांगा.

(अ) खड्ड्यातील फुटबॉल काढण्यासाठी प्रयत्न करणारे.

(आ) सशांना मदत करणारा.

प्र. ४. गोष्टीत शेवटी काय झाले असेल ते कल्पना करून सांगा व रिकाम्या चौकटीत चित्र काढा.

प्र. ५. सर्व चित्रे पाहा व गोष्ट सांगा.

प्र. ६. घ, ठ, थ, प या अक्षरांपासून चित्रे तयार केली आहेत. त्यांचे निरीक्षण करा. यांसारख्या इतर अक्षरांपासून तुम्हांलाही वेगळी चित्रे काढता येतील. कल्पना करा आणि चित्रे काढा.




- शब्द ओळखा व कार्डांवर लिहा.

| | | |
|---|---|---|
| | वे | |
| ब | ग | ळा |
| | ळा | |

| | | |
|---|---|---|
| | मां | |
| गा | ज | र |
| | र | |

| | | |
|---|---|---|
| | म | |
| त | ग | र |
| | र | |

| | | |
|---|---|---|
| | क | |
| भ | ड | क |
| | क | |

| | | |
|---|---|---|
| | सा | |
| क | मा | न |
| | न | |

| | | |
|---|---|---|
| | वा | |
| फु | टा | णा |
| | णा | |

| | | |
|---|---|---|
| | आ | |
| प्र | का | श |
| | श | |


| | | |
|---|---|---|
| | फा | |
| तु | ट | के |
| | के | |


**शिक्षकांसाठी :** वरीलप्रमाणे अक्षरांपासून शब्द तयार करण्याचा खेळ घ्यावा. शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द, उदा., 'णा' – वाटाणा, फुटाणा, शेंगदाणा. अशा प्रकारचे शब्दखेळ घेऊन विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढवावी. ते शब्द विद्यार्थ्यांकडून वहीवर लिहून घ्यावे.

# ३. खेळूया शब्दांशी

A483L6

- वाचा. सांगा. जिंका.








**शिक्षकांसाठी :** खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना सांगावे. 'अ' या चौकोनापासून सुरुवात करावी. कॅरमची एक सोंगटी घ्यावी. तिच्या एका बाजूला लाल व दुसऱ्या बाजूला हिरवा रंग द्यावा. खेळताना सोंगटीची लाल रंगाची बाजू पडली, तर एक घर पुढे जावे. सोंगटीची हिरव्या रंगाची बाजू पडली, तर दोन घरे पुढे जावे. प्रत्येक घरात एक अक्षर लिहिले आहे. ज्या घरात तुमची सोंगटी असेल, त्या घरातील अक्षर वाचावे. त्या अक्षराचा शब्द सांगावा. (शब्द सांगण्यासाठी उदाहरणादाखल काही चित्रे दिलेली आहेत.) सोंगटीची लाल रंगाची बाजू पडल्यास दोन शब्द सांगावे. सोंगटीच्या हिरव्या रंगाची बाजू पडल्यास एक शब्द सांगावा. ज्या खेळाडूला शब्द सांगता येणार नाही, त्याची संधी जाईल. जो सर्वांत आधी 'ज्ञ' अक्षरावर पोहचेल तो जिंकेल. हा खेळ गटागटांत घ्यावा. प्रत्येक गटाला एक-एक सोंगटी द्यावी. विद्यार्थ्यांना पुस्तकातील हे पृष्ठ उघडून खेळण्यास सांगावे.
(ऋ, अः, ण, ळ, ॲ, ऑ  ही अक्षरे घेतलेली नाहीत. अः, ण, ळ ह्या अक्षरांपासून सुरू होणारे शब्द मराठी भाषेत नाहीत, तसेच ऋ या अक्षरापासून थोडेच शब्द तयार होतात, म्हणून वरच्या खेळात ही अक्षरे घेतलेली नाहीत.)

# ४. ही पिसे कोणाची?

• वाचा.



मिनूचे घर शेतात होते. ती खेळता खेळता घरापासून खूप दूर आली. तिला दोन पिसे दिसली. तिने ती पिसे उचलली. तिला ती पिसे खूप आवडली.

तिला वाटेत एक कोंबडी दिसली. मिनूला वाटले, ही पिसे नक्कीच कोंबडीची असणार, म्हणून तिने कोंबडीला विचारले, ''कोंबडीताई, कोंबडीताई ही पिसं तुझी आहेत का?''



कोंबडीने पिसांकडे निरखून पाहिले. ''नाही गं बाई, ही पिसं माझी नाहीत,'' असे म्हणून कोंबडी खुराड्यात जाऊन बसली.

'कोणाची आहेत बरं ही पिसं?' असे म्हणत मिनू एका झाडाजवळ आली. तिला झाडावर पांढऱ्या–



करड्या रंगाचे एक कबुतर दिसले. त्याला पाहून मिनूला वाटले, 'याची तर नाहीत ही पिसं?' तिने कबुतराला विचारले, ''कबुतरदादा, कबुतरदादा ही पिसं तुझी आहेत का?'' कबुतर म्हणाले, ''नाही गं बाई, ही पिसं माझी नाहीत.''

'कोणाची आहेत बरं ही पिसं?' या विचारात मिनू पुढे निघाली. समोरून आपला पिसारा सावरत मोर येत होता.




त्याची ऐटदार चाल आणि रंगीबेरंगी लांबसडक पिसारा खूप मोहक दिसत होता. तिने आपल्या हातातील पिसे निरखून बघितली. ही पिसे नक्कीच मोराची नाहीत, हे तिला जाणवले. तरीही तिने मोराला विचारले, ''अरे मोरा, ही पिसं कोणाची आहेत, हे तुला माहीत आहे का?'' मोराने पिसांचे निरीक्षण केले. तो म्हणाला, ''ही तर बदकाची आहेत.''

मिनूला खूप आनंद झाला. तिने मोराला विचारले, ''मला बदक कोठे भेटेल?'' मोराने बदकाचा पत्ता सांगितला. त्याचे आभार मानून मिनू पळतच नदीवर आली. नदीकिनारी दाट झाडी होती. तिने बदकाला हाक मारली.

बदक झाडीतून बाहेर आले. मिनूने त्याच्यासमोर हातातील पिसे धरली आणि त्याला म्हणाली, ''ही तुझी पिसं मला सापडली आहेत. मी तुला शोधत होते. ही घे तुझी पिसं.''

बदकाला मिनूचे कौतुक वाटले. बदक मिनूला म्हणाले, ''मिनू, तू माझी पिसं देण्यासाठी इतक्या दूर आलीस, म्हणून ही पिसं तुझ्याजवळच ठेव. एकदा पिसं गळून पडली, की ती पुन्हा जोडली जात नाहीत. तुला अशीच वेगवेगळी पिसं सापडली तर ती तू सांभाळून ठेव.''

मिनू आनंदाने घरी आली. तिने बदकाने दिलेली पिसे आपल्या वहीत ठेवली.



**शब्दार्थ :** **दूर** – लांब. **निरखून पाहणे** – लक्षपूर्वक पाहणे. **मोहक** – सुंदर.

## स्वाध्याय

**प्र. १. उत्तरे सांगा.**

(अ) मिनूचे घर कोठे होते?

(आ) मिनू कोणाकोणाला भेटली?

(इ) मिनूला बदकाचा पत्ता कोणी सांगितला?

(ई) पिसे कोणाची होती?

(उ) बदकाने मिनूला काय सांगितले?

**प्र. २. रिकाम्या जागी जुळणाऱ्या योग्य पर्यायापुढे '✓' अशी खूण करा.**

पिसे सापडल्यावर मिनूला....

(अ) पिसे कोणाची आहेत, हे माहीत करून घ्यायचे होते. ☐

(आ) पिसे घरी न्यायची होती. ☐

**प्र. ३. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) बदक | (अ) झाड |
| (२) कोंबडी | (आ) नदी |
| (३) कबुतर | (इ) खुराडे |

**प्र. ४. उदाहरणे वाचा. त्याप्रमाणे लिहा.**

**उदाहरणे** – घर – घरापासून    गाव –    तळे –

घर – घराजवळ    पाय –    घरटे –

खुराडे – खुराड्यात




**प्र. ५. तुम्हांला शाळेत/वर्गात एखादी वस्तू सापडली तर तुम्ही काय करता?**

**उपक्रम :** तुमच्या परिसरात आढळणाऱ्या विविध पक्ष्यांच्या पिसांचे निरीक्षण करा व त्यांचे आकार, रंग यांची माहिती लिहा.

**शिक्षकांसाठी :** लिहिताना 'पिसे' असे लिहितात. बोलताना 'पिसं' असा उच्चार करतात, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे. 'पिसं' आणि 'पिसे' ही एकाच शब्दाची दोन रूपे आहेत. े अशा मात्रेऐवजी ं हे चिन्ह वापरले जाते. त्या वेळी या चिन्हाचा उच्चार अनुस्वारासारखा करू नये. विद्यार्थ्यांकडून पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. कोणत्याही एका परिच्छेदाचे श्रुतलेखन करून घ्यावे.

# ५. डराव डराव!

• ऐका. वाचा.


डराव डराव! डराव डराव!
का ओरडता उगाच राव?
    पत्ता तुमचा नव्हता काल
    कोठुनि आला? सांगा नाव.

धो धो पाउस पडला फार
तुडुंब भरला पहा तलाव.
    सुरू जाहली अमुची नाव
    आणिक तुमची डराव डराव!

बटबटीत डोळ्यांचे ध्यान
विचित्र तुमचे दिसते राव!
    सांगा तुमच्या मनात काय?
    ही घ्या छत्री, ही घ्या नाव.

जा, गाठा जा, अपुला गाव
आणि थांबवा डराव डराव!

**– ग. ह. पाटील**



**शब्दार्थ :** **तुडुंब भरणे** – काठोकाठ भरणे. **जाहली** – झाली. **आणिक** – आणि. **बटबटीत** – मोठाले, विद्रूप. **ध्यान** – विशिष्ट रूप. **गाठणे** – पोहचणे. **अपुला** – आपला, स्वत:चा.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) 'डराव डराव' आवाज कोण करतो?

(आ) तलाव का भरला?

(इ) बेडकाचे डोळे कसे आहेत?

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| **‘अ’ गट** | **‘ब’ गट** |
|---|---|
| (१) जोराचा पाऊस | (अ) गाठा अपुला गाव |
| (२) बेडकाचे मोठे डोळे | (आ) धो-धो पाऊस |
| (३) पूर्ण भरलेला तलाव | (इ) बटबटीत डोळे |
| (४) स्वत:च्या गावी परत जा | (ई) तुडुंब भरला तलाव |

**प्र. ३. गोलातील शब्द वाचा. चित्रे ओळखा. त्यांच्या योग्य जोड्या जुळवा.**




**प्र. ४. पाण्यातून प्रवास करण्यासाठी कोणकोणती साधने वापरतात?**

**प्र. ५. पावसात भिजू नये, यासाठी तुम्ही काय काय वापरता?**

**प्र. ६. निरीक्षण करा. आवाज सांगा व लिहा.**

(अ) वाऱ्याने हालणाऱ्या झाडांच्या पानांचा आवाज.

(आ) उडायला सुरुवात करताना पक्ष्यांच्या पंखांचा आवाज.

(इ) तापलेल्या तेलातील मोहरीचा आवाज.

**प्र. ७. छत्रीचे चित्र काढा. रंगवा.**

- **वाचा. लक्षात ठेवा.**

‘नाव’ हा शब्द या कवितेत दोन अर्थांनी आला आहे.

**नाव** – वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी यांना दिलेले विशिष्ट नाव.

**नाव** – होडी.


**शिक्षकांसाठी** : परिसरातील विविध प्राण्यांचे, पक्ष्यांचे आवाज मुलांना लक्षपूर्वक ऐकण्यास सांगावे. मुलांना शक्य असलेल्या प्राणी व पक्ष्यांचे आवाज वर्गात काढण्यास सांगावे. शक्य असल्यास विविध प्राणी व पक्ष्यांच्या आवाजांची ध्वनिफीत ऐकवावी.

# ६. ऐकूया. खेळूया.






• ऐका. चित्रे पाहा. कृती करा.



शाळेच्या मैदानावर पन्नास मीटर धावा.



बेडकाप्रमाणे दहा उड्या मारत जा.




शंकूवरून उड्या मारत जा.



हत्तीसारखे तीन मीटर चाला.



एका जागी पाच उंच उड्या मारा.



चार कोलांट्या उड्या मारा.



जमिनीवरील शिडीच्या चौकोनांतून धावा.



दोरीवरच्या वीस उड्या मारा.

# ७. खेळत खेळत वाचूया!

AGDZ7N

- सोंगटी टाका – पुढे चला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आरोग्य २१ | मोठ्यांचा आदर न करणे. २२ | निसर्गाचे संवर्धन. २३ | आळस करणे. २४ | शेवट २५ |
| २० | १९ | १८ | झाडांची काळजी घेणे. १७ | खोटे बोलणे. १६ |
| नियमित व्यायाम करणे. ११ | वाईट बोलणे. १२ | पाण्याची काटकसर करणे. १३ | दुसऱ्यांना मदत करणे. १४ | १५ |
| १० | जेवताना रडणे. ९ | ८ | ७ | ६ |
| सुरुवात १ | पाणी जपून वापरणे. २ | ३ | ४ | मित्राला मदत करणे. ५ |

**शिक्षकांसाठी :** खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना सांगावे. एक या घरापासून खेळ खेळायला सुरुवात करावी. कॅरमची एक सोंगटी घ्यावी. सोंगटीच्या एका बाजूला लाल रंग, तर दुसऱ्या बाजूला हिरवा रंग द्यावा. लाल रंग पडला तर एक घर पुढे जावे. हिरवा रंग पडला तर दोन घरे पुढे जावे. खेळता खेळता शिडी आली, तर ती चढताना दोन्ही घरातील संदेश वाचावा. शिडीने वर गेल्यास बक्षीस मिळेल. सापाचे तोंड असलेल्या घरात आल्यास तेथील मजकूर वाचावा व त्याच्या शेपटी असलेल्या घरात यावे. याप्रमाणे जो शेवटच्या घरात लवकर पोहचेल तो विजयी. गटागटांत हा खेळ घ्यावा. प्रत्येक गटाला एक-एक सोंगटी द्यावी. पुस्तकातील हे पृष्ठ उघडून खेळण्यास सांगावे.

## वाचू आणि हसू.



**पेशंट** : डॉक्टर, माझं वजन खूप वाढतंय. त्यामुळे माझी तब्येत ठीक राहत नाही.

**डॉक्टर** : तब्येत चांगली राहण्यासाठी रोज व्यायाम करा. मैदानी खेळ खेळा.


**पेशंट** : मैदानी खेळ तर मी रोज खेळतो. फुटबॉल, टेनिस, क्रिकेटदेखील खेळतो.

**डॉक्टर** : किती वेळ खेळता?

**पेशंट** : मोबाइलची बॅटरी संपेपर्यंत.

# ८. कोणापासून काय घ्यावे ?

• ऐका. वाचा.



सूर्यापासुन रंग घेउया
चंद्रापासुन शांती,
चमचमणाऱ्या ताऱ्यापासुन
दिव्य घेउया कांती.

फुलापासुनी गंध घेउया
कोकिळाकडुन गाणे
झुळझुळणाऱ्या झऱ्यापासुनी
घेऊ नवे तराणे.

झाडापासुन घेउ सावली
मातीपासुन जगणे,
गडगडणाऱ्या ढगापासुनी
घेऊ जीवनगाणे.

प्रभातकाळी एक शिकूया
जगवित जीव जगूया,
संध्यासमयी एक होउनी
सारे मित्र हसूया.

**– निलम माणगावे**

शब्दार्थ : **कांती** – तेज. **प्रभातकाळ** – पहाट, सूर्योदयाचा काळ. **संध्यासमयी** – संध्याकाळी.

## स्वाध्याय

प्र. १. रिकाम्या जागा भरा.

(अ) .......... घेउ सावली.
.......... पासुन जगणे.

(आ) .......... एक शिकूया.
.......... जीव जगूया.

प्र. २. कवितेतील कोणाकडून काय घेता येईल ते लिहा.

(अ) सूर्य (आ) चंद्र (इ) तारा (ई) फूल
(उ) कोकीळ (ऊ) झरा (ए) झाड (ऐ) माती

AGHV9B

प्र. ३. कवितेत 'चमचम' शब्द आलेला आहे. यासारखे शब्द माहीत करून घ्या व लिहा.

# ९. सिंह आणि बेडूक

AGHRAY

- ऐका. वाचा. लक्षात घ्या.

एका  एक  राहायचा. त्याला त्या  कंटाळा आला आणि तो नव्या  राहायला गेला. एकदा  मोठ्याने गरजला. त्या  अनेक  तसेच काही बेडूकही राहत होते. त्यांनी यापूर्वी  पाहिले नव्हते. त्यांचा  पुढारी म्हणाला, ''कोणीतरी मोठा आवाज काढत आहे. आता मीही मोठा आवाज काढतो.''  मोठा आवाज काढला.  हा आवाज नवीन होता.  वाटले, 'कोणीतरी आपल्याला आव्हान देत आहे, आपण सावध राहिले पाहिजे.'  आपली गर्जना थांबवली. तो शांत उभा राहिला.  मोठमोठ्याने ओरडत पुढे पुढे सरकू लागला.  त्याला पाहिले व त्याचा आवाज ऐकला.  वेगाने पुढे सरकला.  डोक्यावर पाय दिला.  गयावया करू लागला.  त्याला सोडून दिले.

– मुकुंद तळवलकर

जंगलात, सिंह, जंगलाचा, जंगलात, सिंह, जंगलात, प्राणी व पक्षी, सिंहाला, बेडूक, बेडकाने, सिंहाला, सिंहाला, सिंहाने, बेडूक, सिंहाने, सिंह, सिंहाने बेडकाच्या, बेडूक, सिंहाने.

**शिक्षकांसाठी :** वर दिलेल्या कथेमध्ये चित्रांच्या जागी चौकटीतील शब्द घेऊन कथा स्वतः वाचावी. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी. विद्यार्थ्यांना कथा लिहायला सांगावे.

## स्वाध्याय

**प्र. १. या गोष्टीतील प्राण्यांची नावे सांगा व लिहा.**

**प्र. २. सिंह व बेडूक यांमध्ये हुशार कोण, ते सांगा.**

**प्र. ३. गोष्टीतील प्राण्यांचा आवाज कसा आहे ते माहीत करून घ्या. आवाज काढून दाखवा.**

- **खालील प्राण्यांच्या ओरडण्याला काय म्हणतात ते वाचा.**

(अ) वाघाची – डरकाळी  
(आ) हत्तीचा – चीत्कार  
(इ) गाईचे – हंबरणे  
(ई) बकरीचे – बें-बें  
(उ) घोड्याचे – खिंकाळणे  
(ऊ) कुत्र्याचे – भुंकणे

## चित्रसंदेश

- **ऐका. वाचा.**



नको डोक्यावर पाटी,  
हवी हातात पाटी.



झाडे लावा, झाडे जगवा.  
प्रदूषण टाळा, जग वाचवा.




नको दंड, नको शिक्षा.  
स्वच्छ गाव हीच अपेक्षा.



जपून वापर पाण्याचा.  
आधार असे हा जगण्याचा.

- **वाचा. लक्षात ठेवा.**


वरील संदेशात ‘पाटी’ हा शब्द दोन अर्थांनी आला आहे.

**पाटी** – १. टोपली. २. ज्यावर लिहिले जाते ती.

**संदेश** – मुलामुलींच्या डोक्यावर पाटी नको, हातात पाटी द्या, म्हणजे मुलामुलींना शिकवा.

# १०. बैलपोळा

- ऐका. वाचा.



सण बैलांचा
आज पोळा,
गोठ्यातील बैल
न्हाऊ घाला.



मखमली झुली,
रंगीत शिंगे,
कपाळी बांधली
रेशमी बाशिंगे.

ढवळ्या-पवळ्या
सजलेधजले.
गावभर बघा
मिरवू लागले.



आजच्या दिनी
नाही कामधाम,
पुरणपोळी खाऊन
नुसता आराम.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

---

**शब्दार्थ : न्हाऊ घालणे** – अंघोळ घालणे. **झूल** – बैलांच्या अंगावर टाकण्यात येणारे रंगीत व नक्षीदार कापड. **बाशिंग** – बैलांच्या डोक्याला बांधण्याचे आभूषण. **दिन** – दिवस.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) बैलांच्या सणाला काय म्हणतात?
(आ) बैलांना कसे सजवले आहे?
(इ) बैलांची नावे कोणती आहेत?
(ई) बैलपोळ्याच्या दिवशी बैलांना काय खाऊ घालतात?

**प्र. २. शेवट समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**

**उदा.,** मखमली – झुली.

**प्र. ३. बैल गोठ्यात राहतात, तसे खालील प्राणी कोठे राहतात ते लिहा.**

(अ) घोडा  (ई) हत्ती

(आ) वाघ  (उ) मासा

(इ) माकड  (ऊ) कासव

**प्र. ४. खालील शब्दांपासून अनेक शब्द बनवा.**

**उदा.,** कपाळी – कळी, पाळी, पाक, पाकळी.

(अ) पुरणपोळी

(आ) गावभर


**प्र. ५. 'सजलेधजले' अशा शब्दांना जोडशब्द म्हणतात. कवितेत आलेले खालील जोडशब्द वाचा. जसेच्या तसे पाहून लिहा. असे आणखी काही जोडशब्द लिहा.**

(अ) कामधाम

(आ) पुरणपोळी

**प्र. ६. 'गावभर मिरवणे' म्हणजे संपूर्ण गावातून फिरणे. खालील शब्दांना 'भर' हा शब्द जोडा आणि वाक्यांत उपयोग करा. सांगा.**

**उदा.,** बाबांनी पोतंभर धान्य आणलं.




**प्र. ७. तुमच्या आवडत्या प्राण्याची माहिती पाच वाक्यांत लिहा.**

---

- **खालील चौकटींत काही अक्षरे दिलेली आहेत. त्या अक्षरांपासून फुलांची तेरा नावे तयार होतात. ती शोधा व लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पा | रि | जा | त | क | मो |
| जा | ई | जु | ई | म | ग |
| गु | ल | छ | डी | ळ | रा |
| ला | चा | फा | अ | शे | जा |
| ब | झें | डू | बो | वं | स्वं |
| स | दा | फु | ली | ती | द |

AH6HCL

# ११. इंधनबचत

• ऐका. वाचा.



दिनूची आई आजारी होती. तो स्वयंपाकघरात आईसाठी चहा करत होता. दारावरची बेल वाजली. त्याने दार उघडले, तर समोर त्याची वर्गमैत्रीण फातिमा उभी होती. त्याने तिला घरात बोलावले.

**दिनू** : फातिमा ये. बस.

**फातिमा** : दिनू, तू काय करतोस?

**दिनू** : आईसाठी चहा करतोय. तुझ्यासाठीही करू का?

**फातिमा** : (हसत-हसत) नको, मी चहा घेत नाही. काय रे! एक कप चहा करण्यासाठी एवढं मोठं पातेलं?

**दिनू** : काय बिघडलं?

**फातिमा** : अरे, छोटं पातेलं घेतलं असतंस, तर पाणी लवकर उकळलं असतं.

**दिनू** : हे माझ्या लक्षातच आलं नाही.

**फातिमा** : अरे, छोट्या पातेल्यामुळे चहा लवकर झाला असता आणि हो ! इंधनाची म्हणजे गॅसचीही बचत झाली असती. समजलं?

**दिनू** : समजलं. समजलं आणि लक्षातही आलं. दिनूने चहा कपात ओतला आणि आईला नेऊन दिला.

## स्वाध्याय

AHFIE9


**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हा संवाद कोठे झाला?


(आ) संवादात किती पात्रे आहेत?

(इ) दिनूला कशाचे महत्त्व पटले?

**प्र. २. खालील चित्रे पाहा. त्यांखालील वाक्ये वाचा. इंधनबचतीचे आणखी मार्ग सांगा.**




**पाणी तापवताना पातेल्यावर झाकण ठेवा.**



**सायकलवरून प्रवास करा.**





बसने, रेल्वेने प्रवास करा.




सौरऊर्जेचा वापर करा.


प्र. ३. खालील साधने ओळखा. ही साधने वापरण्यासाठी कोणते इंधन लागते? यांपैकी कोणते साधन वापरल्यामुळे सर्वांत जास्त इंधनबचत होते ते घरी चर्चा करून सांगा.


















## वाचू आणि हसू.

**सनी** : आई, वाढदिवसाला मी तुला आरसा देणार आहे.

**आई** : अरे सनी, पण आपल्याकडे आहे ना आरसा!

**सनी** : अगं आई, तो मघाशीच माझ्याकडून फुटला ना!



# १२. बोलावे कसे?

AHPEFH

• **पाहा. वाचा.**

**प्रसंग पहिला**

एके दिवशी संजू फोन करतो.
तेवढ्यात तिथे अंजू येते.







संजू झटकन फोन ठेवतो.




अंजू त्याला समजावून सांगते.




**शिक्षकांसाठी :** वरील चित्रांत दिलेला संवाद विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावा. अशा प्रकारचे संवाद तयार करून विद्यार्थ्यांकडून वर्गात सादर करून घ्यावे.

## प्रसंग दुसरा

बसमध्ये खूप गर्दी. शेजारी एक आजी उभ्या आहेत. दिनेश एका जागेवर बसला आहे.




आजी उभ्या असलेल्या दिनेशला दिसताच तो आपल्या जागेवरून उठतो.




आजी दिनेशच्या जागेवर बसतात.







आजी दिनेशकडे कौतुकाने पाहतच राहिल्या.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून दोन्ही प्रसंगांचे प्रकट वाचन व सादरीकरण करून घ्यावे. एखादा वेगळा प्रसंग देऊन त्यावर वर्गात चर्चा करावी.

**प्र. १. अशा वेळी तुम्ही काय कराल, ते लिहा.**

(अ) तुम्ही प्रवास करताना एखादी वृद्ध व्यक्ती बसमध्ये उभी आहे.
(आ) लहान मूल कडेवर घेऊन एक काकू बसमध्ये उभ्या आहेत.
(इ) तुमच्या घरच्या फोनवर अनोळखी व्यक्तीचा फोन आला आहे.
(ई) एखादी अनोळखी व्यक्ती पत्ता शोधत तुमच्या घरी आली आहे.
(उ) तुमच्या शाळेतील एखादा अपंग विद्यार्थी तुमच्या घराजवळ राहतो.

**प्र. २. खालील रकाने वाचा व शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

| व्यक्ती | वस्तू / ठिकाण / वाहन | गुण |
|---|---|---|
| अंजू, संजू, दिनेश, आजी | घर, फोन, बस, रेल्वे | नम्रपणा |

**व्यक्ती, वस्तू, गुण यांच्या नावांना 'नाम' असे म्हणतात.**

**प्र. ३. खालील वाक्यांतील 'नामे' ओळखा. त्यांखाली रेघ ओढा.**


(अ) हॅलो काका, मी संजू बोलतोय.
(आ) आजी, तुम्ही या जागेवर बसा.
(इ) दिनेश हा गुणी मुलगा आहे.

**प्र. ४. खालील वाक्यांत योग्य नामे लिहा.**

(अ) ......... हा माझा जिवलग मित्र आहे.
(आ) माझ्या दप्तरात ...., ....., .... या वस्तू आहेत.

**प्र. ५. खालील गोलातील शब्दांना शेजारच्या माळेतील योग्य मणी लावा. नवीन शब्द तयार करा.**

**उदा.**, ओल – ओलावा.




- **वाचा.**
- *वृद्धांना नेहमी मदत करावी.*
- *वडीलधाऱ्या माणसांशी नेहमी आदराने बोलावे.*
- *आपली चूक असेल, तर मोठ्या मनाने ती कबूल करावी.*

# १३. अनुभव – १

• वाचा.



मारिया दुपारी शाळेतून घरी आली. घराला कुलूप होते. आज तिचे आईबाबा लग्नाला गेले होते. तिने कुलूप उघडले. घरात आली. खिडक्या उघडल्या. गणवेश बदलला. हातपाय धुऊन ती घरात खाऊ शोधत होती.

अचानक खिडक्यांची दारे एकमेकांवर धाड्धाड् आपटू लागली. वारा सूंऽऽ सूंऽऽ करत वाहू लागला. आभाळात ढगांनी गर्दीच गर्दी केली. ढगांचा गडगडाट व विजांचा कडकडाट सुरू झाला. पाऊस धोऽ धोऽ कोसळू लागला. मारियाने पटापट दारे, खिडक्या बंद केल्या.

तिचे लक्ष घड्याळाकडे गेले. बराच उशीर झाला आहे, असा विचार करतच ती जवळच्या खुर्चीत बसली. हळूहळू तिला पावसावरच्या कविता आठवू लागल्या. ती कविता गुणगुणू लागली.

पावसाचा आवाज कमी झाला अन् मारियाने खिडकी उघडली. बाहेर रिमझिम रिमझिम पाऊस पडतच होता. वाहणाऱ्या पाण्याचा खळखळाट हळूहळू कमी झाला आणि थोड्याच वेळात पाऊस थांबला. झाडांच्या पानांतून टप्टप् पाणी गळत होते. पानांआड बसलेले पक्षी बाहेर आले. पंखांची फडफड करून त्यांनी पंखांवरील पाणी झटकले. मारियाने आकाशाकडे पाहिले. बाहेर लख्ख ऊन पडलेले होते. सगळीकडे कसे स्वच्छ, सुंदर वाटत होते.

तेवढ्यात दारावरची बेल वाजली – डिंगडाँऽऽग. 'आई आली', असे म्हणतच मारिया पळत पळत दाराकडे गेली.



तिने दार उघडले. आईबाबांना पाहिले. इतका वेळ वाट पाहत कंटाळलेली मारिया आईला जाऊन बिलगली. आईने तिला प्रेमाने जवळ घेतले.

शब्दार्थ : **धाड्धाड् आपटणे** – जोरजोरात आदळणे. **पाऊस धोऽ धोऽ कोसळणे** – खूप जोराचा पाऊस पडणे. **गुणगुणणे** – हळू आवाजात गाणे. **पानांआड** – पानांमागे. **बिलगणे** – प्रेमाने मिठी मारणे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या पाठाचे मूकवाचन करून घ्यावे. पाठातील कोणत्याही एका परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे. ते तपासावे. लेखनातील चुका सांगून त्यांच्याकडून दुरुस्त करून घ्याव्या.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मारियाच्या घराला कुलूप का होते?

(आ) मारियाने दारे, खिडक्या का बंद केल्या?

(इ) पानांआड लपलेले पक्षी केव्हा बाहेर आले?

(ई) मारिया आईला का बिलगली?

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) ढगांचा | (अ) खळखळाट |
| (२) विजांचा | (आ) फडफडाट |
| (३) पाण्याचा | (इ) गडगडाट |
| (४) पंखांचा | (ई) कडकडाट |

**प्र. ३. वाचा. सांगा. लिहा.**

(अ) शब्दांची पुनरावृत्ती झालेले शब्द. उदा., धाड्धाड्.

(आ) नादमय शब्द. उदा., कडकडाट, गडगडाट. यांसारखे तुम्हांला माहीत असलेले शब्द सांगा.

**प्र. ४. खालील शब्द वाचा व पाहून तसेच लिहा.**

(अ) घड्याळ (इ) हळूहळू (उ) रिमझिम

(आ) खिडक्या (ई) गुणगुणू (ऊ) खळखळाट

**प्र. ५. रिकाम्या जागी विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्ये पूर्ण लिहा.**

(अ) पाऊस सुरू झाला. पाऊस ......... .

(आ) मारिया सावकाश दाराकडे गेली. मारिया .......... .

**प्र. ६. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) चढणे × (इ) उंच × (उ) स्वच्छ ×

(आ) आठवणे × (ई) बाहेर × (ऊ) थांबणे ×

**प्र. ७. पावसाळ्यातील तुमचा अनुभव सांगा.**

**प्र. ८. पावसाळ्यात तुम्ही आरोग्याविषयी कोणती काळजी घ्याल?**

**प्र. ९. खाली दोन प्रकारचे शब्दसमूह दिलेले आहेत, ते वाचा. कोणत्या शब्दसमूहांचा अर्थ कळतो व कोणत्या शब्दांवरून कळतो ते समजून घ्या.**

| शब्दसमूह | शब्दसमूह | शब्दसमूहाचा अर्थ कळतो तो शब्द |
|---|---|---|
| १. मारियाने कुलूप | मारियाने कुलूप **उघडले.** | **उघडले** |
| २. मारियाने दारे, खिडक्या | मारियाने दारे, खिडक्या **बंद केल्या.** | **बंद केल्या** |
| ३. मारिया आईला | मारिया आईला **बिलगली.** | **बिलगली** |

मागील तक्त्यातील दुसऱ्या शब्दसमूहांत कोणती क्रिया झाली हे दाखवणारे शब्द दिले आहेत. उदा., उघडले, बंद केल्या, बिलगली. क्रिया सांगणाऱ्या या शब्दांमुळे वाक्यांचा अर्थ कळतो. या शब्दांना **क्रियापद** म्हणतात.

**प्र. १०. खालील शब्दसमूह वाचा. त्यांतील क्रियापदे ओळखा. त्यांखाली रेघ ओढा.**

(अ) पक्षी बाहेर आले.

(आ) मारियाने आकाशाकडे पाहिले.

(इ) दारावरची बेल वाजली.

(ई) मारिया पळत दाराकडे गेली.

**प्र. ११. क्रियापदे घालून वाक्ये पूर्ण करा.**

(अ) मारिया घरी ............ .

(आ) मारिया कविता .............. .

(इ) मारियाने दार .............. .

(ई) मी चेंडू .............. .

(उ) ताई पुस्तक ................ .

**प्र. १२. खालील शब्द वाचा. त्या शब्दांत आलेली 'र' ची रूपे शोधा. शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (अ) **सूर्य** | (इ) **चंद्र** | (उ) **कैऱ्या** | (ए) **प्राणी** | (ओ) **महाराष्ट्र** |
| (आ) **पर्वत** | (ई) **समुद्र** | (ऊ) **पऱ्या** | (ऐ) **प्रकाश** | (औ) **ट्रक** |

**उपक्रम :** पावसाबरोबर आलेले शब्द वाचा. त्या शब्दांचा उपयोग करून वाक्ये सांगा.
**उदा.,** पावसाची बुरबुर सुरू झाली.




AHYAHJ

# १४. चित्रसंदेश

AI86J7

* पाहा. सांगा.




बसमध्ये किंवा बसमधून बाहेर थुंकू नये.



बसमध्ये कचरा टाकू नये.



चालत्या वाहनात घाईघाईने चढू अगर उतरू नये.



चालत्या वाहनातून हात बाहेर काढणे व डोकावून पाहणे धोक्याचे आहे.

*विनातिकीट प्रवास करणे हा गुन्हा आहे.*

*मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक.*

## स्वाध्याय

प्र. १. बसमधील सूचना व संदेशांचे वाचन करा.

प्र. २. सार्वजनिक ठिकाणी लिहिलेल्या सूचना वाचा. त्या वहीत लिहा. वर्गात वाचून दाखवा.

प्र. ३. वर्गात भिंतीवर लिहिता येतील, अशा सूचना तयार करा.

प्र. ४. काही लोक सूचनांप्रमाणे वागत नाहीत. ते तसे का वागत नसावेत? आपसात चर्चा करा.

प्र. ५. तुमच्या शाळेत कोणकोणत्या ठिकाणी सूचना लिहाव्या लागतील, ती ठिकाणे ठरवा. तेथे लिहायच्या सूचना मित्रांशी चर्चा करून तयार करा.

# १५. नदीचे गाणे

- ऐका. वाचा.

दरीदरीतुन, वनावनांतुन,
झुळझुळ मी वाहत येते,
मी मंजुळ गाणे गाते,
मी पुढेच धावत जाते.

वसली गावे तीरावरती,
त्यांना भेटुनि जाते पुढती,
लतावृक्ष किती काठावरती,
भूमितुनी जे मला भेटती.

फुलवेली मज सुमने देती,
कुठे लव्हाळी खेळत बसती,
कुठे आम्रतरू माझ्यावरती,
शीतल अपुली छाया धरती.

पाणी पिउनी पक्षी जाती,
घट भरुनी कोणी जल नेती,
गुरे-वासरे जवळी येती,
मुले खेळती लाटांवरती.

मी कोणाची – मी सर्वांची,
बांधुनिही मज नेणाऱ्यांची!
जेथे जाईन – तेथे फुलवीन,
बाग मनोहर आनंदाची!

**– वि. म. कुलकर्णी**



शब्दार्थ : **मंजूळ** – ऐकायला गोड. **तीर** – काठ. **लता** – वेल. **वृक्ष** – झाड. **सुमन** – फूल. **लव्हाळी** – पाण्यात किंवा पाण्याजवळ वाढणारी एक वनस्पती. **आम्रतरू** – आंब्याचे झाड. **शीतल** – थंड. **छाया** – सावली. **घट** – मातीचा घडा (माठ). **मनोहर** – सुंदर.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे सांगा.**

(अ) मंजूळ गाणे कोण गाते?

(आ) गावे कोठे वसली आहेत?

(इ) नदीवर शीतल छाया कोण धरते?

(ई) नदी जेथे जाईल तेथे काय करेल?

**प्र. २. कवितेतील कडव्याच्या ओळी पूर्ण करा.**

फुलवेली मज ............. देती,
कुठे ............. खेळत बसती,
कुठे ............. माझ्यावरती,
............. अपुली छाया धरती.

**प्र. ३. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) झुळझुळ | (अ) गाणे |
| (२) मंजूळ | (आ) छाया |
| (३) शीतल | (इ) पाणी |

**प्र. ४. हे शब्द असेच लिहा.**

मंजूळ, शीतल, झुळझुळ, लतावृक्ष, लव्हाळी, आम्रतरु.


**प्र. ५. कवितेच्या चित्राचे निरीक्षण करा व पाच वाक्ये लिहा.**

AIH2KU

### वाचू आणि हसू.

**शिक्षक** : पप्पू, तू शाळेत टोपी घालून का येतोस?

**पप्पू** : कुणाला कळायला नको, की माझ्या डोक्यात काय चाललं आहे ते!




### ओळखा पाहू!

- लहानपणी हिरवा,
  चव माझी आंबट.
  मोठेपणी पिवळा,
  चव माझी गोड,
  मी तर आहे फळांचा राजा.


- लाल चोच माझी,
  डाळिंब मी खातो.
  हिरवा माझा रंग,
  मिठू मिठू बोलतो.

# १६. मी नदी बोलते...


- **पाहा. वाचा.**





मी आहे नदी. माझा जन्म पर्वतावर होतो. मला अनेक ओढे येऊन भेटतात. त्या ओढ्यांमुळे मी मोठी होत जाते. इतर नद्याही मला येऊन मिळतात.





माणसे धरण बांधून मला अडवतात. माझ्या पाण्यावर वीज तयार करतात. त्या विजेवर कारखाने चालवतात. शेतातील पंप चालवतात. पिण्यासाठी पाण्याचा वापर करतात.




मी उड्या मारते, धावते. उंच कड्यावरून वेगाने कोसळते. धबधब्याच्या रूपाने पर्वतावरून खाली येते.




पर्वतउतारावरून मी सपाट मैदानी भागात येते. आता माझा वेग कमी झालेला असतो. माझ्या दोन्ही किनाऱ्यांवरील परिसर मी हिरवागार करते. माझ्यामुळे शेतकरी शेतात भरपूर धान्य पिकवतात; पण मला एका गोष्टीची खंत आहे. मी सगळ्यांच्या उपयोगी पडते, तरीही माणसे माझ्या प्रवाहात सांडपाणी सोडतात, कचरा टाकतात, मला प्रदूषित करतात.




माणसांच्या वस्त्या, छोटी गावे, शहरे यांच्या जवळून वाहत जाताना मी जास्तच प्रदूषित होते. तरीही मी पुढे पुढे जातच राहते. मी कुठेही थांबत नाही. 'थांबला तो संपला' असेच मी सगळ्यांना सांगत असते. शेवटी मी सागराला जाऊन मिळते आणि नदी म्हणून माझा प्रवास थांबतो.

**शब्दार्थ :** **अडवणे** – थांबवणे. **सागर** – समुद्र.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) नदीचा जन्म कोठे होतो ?

(आ) नदी मोठी कशी होते ?

(इ) नदीच्या पाण्याचा उपयोग लोक कशाकशासाठी करतात ?

(ई) नदीचा वेग कधी कमी होतो ?

(उ) नदी आपल्याला कोणता संदेश देते ?

(ऊ) तुमच्या जिल्ह्यात कोणकोणत्या नद्या आहेत ?

**प्र. २. पहिल्या दोन उदाहरणांचे निरीक्षण करा. त्यानुसार रिकाम्या जागा भरा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | चालणे | चालतात | चालवतात |
| (आ) | पळणे | पळतात | पळवतात |
| (इ) | भेटणे | .......... | ........... |
| (ई) | ....... | करतात | ............ |
| (उ) | मिळणे | ........... | ............ |
| (ऊ) | थांबणे | ........... | ............. |

**प्र. ३. ‘हिरवेगार’, यासारखे रंगछटा दाखवणारे शब्द सांगा.**

**प्र. ४. ‘थांबला तो संपला’ यासारखी सुवचने सांगा. सुवचनांचा संग्रह करा.**

**प्र. ५. खालील शब्द वाचा व तसेच लिहा.**


पर्वत, सर्व, किर्र, पूर्व, मर्कट, सूर्य, प्रवास, चक्र, चंद्र, क्रमांक, प्रकार, ग्रह.

AIQXMH

**उपक्रम :** १. परिसर अभ्यासाची पुस्तके, वर्तमानपत्रे, नकाशे यांतून वेगवेगळ्या नद्यांची नावे शोधा. यादी करा.

२. नदीचे प्रदूषण कमी कसे करता येईल ते चर्चा करून सांगा.

३. खालील घोषवाक्ये पाहा. ‘पाणी वाचवणे’ या संदर्भातील आणखी घोषवाक्ये मिळवा व संग्रह करा.




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पाठाचे मूकवाचन करून घ्यावे. कोणत्याही एका परिच्छेदाचे श्रुतलेखन करून घ्यावे.

## • पाण्याची बचत

**पाण्याची टंचाई आहे. पाणी जपून वापरा.**




पाणी पिताना तुम्हांला हवे तेवढेच पाणी ग्लासमध्ये घ्या.



पाहुण्यांना पिण्यासाठी पाणी देताना तांब्या-पेल्याने पाणी द्या.



भरून ठेवलेले पाणी शिळे समजून ओतून देऊ नका.



पाण्याचा पाइप न वापरता वाहने ओल्या कपड्याने पुसून घ्या.




गळणारे नळ ताबडतोब दुरुस्त करून घ्या. पाण्याची टाकी भरल्यास वेळीच बंद करा.



बादलीत पाणी घेऊन भांडी, कपडे धुवा. नळ वाहता ठेवू नका.



भांड्यात पाणी घेऊन तोंड धुवा. दात घासताना नळ सुरू ठेवू नका.



शॉवरखाली अंघोळ न करता बादलीत पाणी घेऊन अंघोळ करा.



शाळेतून घरी जाताना बाटलीत, वॉटरबॅगमधील उरलेले पाणी वाया घालवू नका. ते पाणी झाडांना घाला.

# १७. आमची सहल



आमची सहल गावच्या आमराईमध्ये गेली होती. सहलीला वर्गातील सर्व मुलेमुली आल्या होत्या. बाईंनी सगळ्यांना जेवणाचे डबे व पाण्याच्या बाटल्या आणायला सांगितले होते. चित्रकलेचे साहित्यही बरोबर घ्यायला सांगितले होते.

आम्ही आमराईकडे निघालो. रस्त्यावर वेगवेगळ्या आकारांची, वेगवेगळ्या प्रकारची झाडे होती. झाडांची दाट सावली रस्त्यावर पडली होती. आम्ही रमतगमत, झाडांचे निरीक्षण करत चाललो होतो. रस्त्याने जाताना बाईंनी विविध झाडांची माहिती सांगितली.

आमराईमध्ये आम्ही सकाळी अकरा वाजता पोहचलो. तेथे आंब्याची खूप झाडे होती. ती ओळीने लावलेली होती. मी बाईंना विचारले, ''बाई, याला आमराई का म्हणायचे?'' बाई म्हणाल्या, ''राई म्हणजे दाट झाडी. जिथे आंब्याची अनेक झाडे लावून ती जोपासलेली असतात, त्याला आमराई म्हणतात.''

पोपट, कोकीळ, चिमण्या, कावळे, साळुंक्या असे कितीतरी पक्षी झाडांवर बसले होते. त्यांचा किलबिलाट चालला होता. पक्षी आनंदाने उडत होते. आम्हीही आनंदाने बागडत होतो. आम्ही लपाछपी, शिवणापाणी, ऊनसावली असे खेळ खेळलो. वाऱ्याने पडलेल्या कैऱ्या गोळा केल्या. सगळ्या कैऱ्यांचा चट्टामट्टा केला. आम्ही सहभोजन केले.

त्यानंतर बाईंनी आम्हांला चित्रे काढायला सांगितली. आंब्याच्या झाडावर पोपट आंबा खातो आहे, असे चित्र मी काढले. कोणी कैऱ्यांनी लगडलेले झाड काढले, तर कोणी खूप पक्षी बसलेले आंब्याचे झाड काढले. कोणी आमराईचे चित्र काढले, तर कोणी कैऱ्या गोळा करणारी, खेळणारी मुले काढली. बाईंनी सर्वांची चित्रे बघितली. त्यांनी आम्हांला कैरी व आंबा यांतला फरक सांगितला. कैरीपासून, आंब्यापासून बनवल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पदार्थांची नावे सांगितली.

सायंकाळी आम्ही घरी परतलो. दिवसभर खेळून, बागडून आणि लांबपर्यंत चालूनदेखील आम्ही थकलो नव्हतो. उलट आम्हांला खूप उत्साही, आनंदी व ताजेतवाने वाटत होते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. पाठातील कोणत्याही एका परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे.

## स्वाध्याय

AIZTP5

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुलांची सहल कोठे गेली होती?

(आ) सहलीला जाताना मुलांनी काय काय सोबत नेले होते?

(इ) बाईंनी आमराईचा अर्थ काय सांगितला?

(ई) आमराईमध्ये मुले कोणते खेळ खेळली?

**प्र. २. ऊनसावली, शिवणापाणी यांसारखे तुम्ही कोणकोणते खेळ खेळता त्यांची माहिती सांगा.**

**प्र. ३. तुमच्या घरी आंबा व कैरीपासून कोणकोणते पदार्थ बनवतात ते लिहा.**

**प्र. ४. तुम्ही सहलीसाठी गेलेल्या ठिकाणाचे वर्णन वर्गात सांगा.**

- **वाचा व लिहा.**

**झाडे, वेली लावू चला,**
**स्वच्छ हवा मिळेल आपल्याला.**

**झाडांची घेता काळजी,**
**फुले, फळे मिळतील ताजी.**

**झाडेच झाडे लावू आपण,**
**तरच कमी होईल प्रदूषण.**

- **खाली दिलेली वाक्ये वाचा व दिलेल्या चाररेघांमध्ये वळणदार अक्षरांत लिहा.**

आमची सहल गावच्या आमराईमध्ये गेली होती.

वाऱ्याने पडलेल्या कैऱ्या आम्ही गोळा केल्या.


झाडांवर पक्ष्यांचा किलबिलाट चालला होता.

**शिक्षकांसाठी :** वर दिलेल्या वाक्यांप्रमाणे चाररेघी वहीमध्ये पाठातील मजकुराचे लेखन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे. त्याचा सराव घ्यावा. विद्यार्थी नीट लिहितात का ते पाहावे. त्यांना वळणदार अक्षरांत लिहिण्यासाठी मार्गदर्शन करावे.

# १८. पैशांचे व्यवहार

- खालील चित्रे पाहा. पैशांचे व्यवहार कोठे कोठे होतात ते सांगा.

















## स्वाध्याय

प्र. १. वरील चित्रांत दाखवलेल्या ठिकाणांना पालकांसोबत भेट द्या. तेथे काय काय पाहिले ते वर्गात सांगा.

प्र. २. बँकेत चालणारे पैशांचे कोणतेही दोन व्यवहार सांगा.

प्र. ३. जोड्या जुळवा.


| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (१) | विजेचे बिल भरणे | (अ) | पोस्ट ऑफिस |
| (२) | मनिऑर्डर करणे | (आ) | दूरध्वनी केंद्र |
| (३) | फोनचे बिल | (इ) | वीज देयक केंद्र |

AJ9PQS


**प्र. ४. दुकानात जा. खालील वस्तूंचे भाव माहीत करून घ्या. किंमत लिहा.**




चित्रकला वही — किंमत ₹




स्केचपेन बॉक्स — किंमत ₹



कंपास — किंमत ₹



शाळेचे बूट — किंमत ₹



छत्री — किंमत ₹



दप्तर — किंमत ₹

**प्र. ५. बँकेत चालणाऱ्या व्यवहारांपुढे ✓ अशी खूण करा. बँकेत होत नसलेल्या व्यवहारांपुढे × अशी खूण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. पैसे भरणे. | ☐ | ५. मनिऑर्डर करणे. | ☐ | ९. वीज बिल भरणे. | ☐ |
| २. पैसे काढणे. | ☐ | ६. विम्याची रक्कम भरणे. | ☐ | १०. कर्ज घेणे. | ☐ |
| ३. पत्र टाकणे. | ☐ | ७. दागिने सुरक्षित ठेवणे. | ☐ | ११. दागिने गहाण ठेवणे. | ☐ |
| ४. चेक देणे. | ☐ | ८. चेक वटवणे. | ☐ | १२. मुदत ठेवीच्या योजना. | ☐ |

**उपक्रम :** भाजी मंडईला भेट द्या. तेथे विकल्या जाणाऱ्या भाज्यांची यादी करा. भाज्यांचे प्रतिकिलो दर विचारा. 'भाजी मंडई' यावर पाच ते सात वाक्ये माहिती लिहा.

## वाचू आणि हसू.




**सोनू** : मिनू, माझ्या बाबांनी कालच 'इनोव्हा कार' घेतली. आता आमच्याकडे तीन गाड्या झाल्या.


**मिनू** : अरे सोनू, माझ्या बाबांकडे कार, स्कूटर, रेल्वे, अगदी विमानसुद्धा आहे.

**सोनू** : अरे वा! मग तर तू सगळ्याच वाहनांतून फिरली असशील!

**मिनू** : नाही रे! माझ्या बाबांचं खेळण्यांचं दुकान आहे ना!

## • लिहा.

**दिलेल्या अक्षरांपासून सुरू होणारे शब्द लिहा.**



# १९. अनुभव – २

• **वाचा.**

शाळा सुटली. मी घरी निघालो. वाटेत आई दिसली. तिच्या हातात दोन मोठ्या पिशव्या होत्या. त्या खूप जड असाव्यात, असे तिच्याकडे पाहून जाणवले. मी धावतच आईला गाठले. ''अगं आई, काय घेऊन चाललीस एवढं?'' मी आईला विचारले.

तिच्या हातातली एक पिशवी घेऊ लागलो.




''अरे हळू. सामान सांडेल त्यातलं.'' ती म्हणाली. ''अगं आई, किती जड आहे पिशवी! काय आहे एवढं यात?'' मी विचारले. ''हे आपलं महिनाभराचं किराणा सामान आहे.'' आई म्हणाली.



एक पिशवी हातात धरल्यावर मला समजले, त्या ओझ्याने आईचे हात लालेलाल झाले होते. ''एवढ्या सामानाला किती रुपये लागले गं आई?'' मी विचारले. ''किती लागले असावेत?'' आईने उलट प्रश्न केला. मी सांगितलेली रक्कम ऐकून आई हसू लागली अन् म्हणाली, ''वा रे, तुझं व्यवहारज्ञान! वस्तूंचे भाव गगनाला भिडलेत. आहेस कुठे तू? जरा बाजारात फिरत जा, दुकानात जात जा.'' मलाही ते पटले. बोलत बोलत आम्ही घरी पोहचलो.

तिने पिशवी खाली ठेवली आणि 'हुश्श' केले. बराच वेळ ती स्वतःचे हात दाबत होती. ''आई, तू दर महिन्याला एवढं ओझं एकटीच घेऊन येतेस?'' मी तिला काळजीने विचारले. ''हो रे, आज तू भेटलास. खूप बरं वाटलं. माझं काम हलकं झालं.'' आई मनापासून बोलत होती. ती खूप दमली होती.



मी आईला म्हणालो, ''आई, ज्या दिवशी माझ्या शाळेला सुट्टी असते, त्याच दिवशी आपण किराणा सामान आणायला जात जाऊ, म्हणजे तूही दमणार नाहीस आणि माझं व्यवहारज्ञानही वाढेल.''

शब्दार्थ : **गाठणे** – पोहचणे. **भाव गगनाला भिडणे** – खूप महाग होणे. **हुश्श करणे** – मोकळा श्वास घेणे.

## स्वाध्याय

**प्र. १. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आईला पाहताच मुलगा धावत का गेला?

(आ) आईचे हात कशामुळे लालेलाल झाले होते?

(इ) आईला बरे का वाटले?

(ई) मुलाने किराणा सामान केव्हा आणायचे ठरवले?

**प्र. २. खालील शब्दांत शरीराचे भाग असणारे शब्द शोधा. लिहा.**

**उदा.**, सामान – मान. पोपट – पोट.

पाठवणी, यजमान, आगबोट, तोंडपाठ, पोटपूजा,
पायपुसणी, गालबोट, नाकतोडा.

**प्र. ३. खालील शब्द वाचा व तसेच लिहा.**

सुट्टी, हुश्श, चक्कर, लख्ख, बग्गी, गच्च, सज्जन, लठ्ठ, उड्डाण, अण्णा,
पत्ता, कथ्थक, जिद्द, घट्ट, अन्न, गप्पा, झिम्मा, अय्या, गल्ली, सव्वा.

**प्र. ४. विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) मोठे × | (इ) जड × | (उ) जाणे × |
| (आ) हसणे × | (ई) खाली × | (ऊ) सांडणे × |

**प्र. ५. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

(अ) सामानाला (आ) बाजारात (इ) चाललीस (ई) मनापासून

**प्र. ६. तुम्ही आईला कोणकोणत्या कामांत मदत करता? आणखी कोणत्या कामांत मदत करू शकाल? ती कशी? वर्गात चर्चा करा.**

**प्र. ७. तुमच्या घराजवळील किराणामालाच्या दुकानात जा. तेथील वस्तूंची यादी करा.**

**प्र. ८. खालील शब्द वाचा. रंगछटा समजून घ्या.**

लालेलाल, काळेकुट्ट, पांढरेशुभ्र, पिवळेधमक, जांभळट, निळसर, हिरवेगार.

**प्र. ९. कंसातील योग्य शब्द निवडून खालील वाक्ये पूर्ण करा.**

(असतो, हळूहळू, शाळा, लवकर, पडली)

(अ) संजू .......... उठतो.

(आ) गोगलगाय .......... चालते.

(इ) हा बंगला नेहमी बंद ...........

(ई) .......... वेळेवर भरते.

(उ) यावर्षी खूप थंडी ...........

AJIKSF

**उपक्रम :** आईविषयी एखादी कविता मिळवा. पाठ करा व वर्गात म्हणून दाखवा.

**शिक्षकांसाठी :** या पाठातील एका परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे. विद्यार्थी अचूक लिहितात का ते पाहावे. त्याबाबत मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांना आलेले वेगवेगळे अनुभव वर्गात सांगण्यास सांगावे.

# २०. गमतीदार पत्र

- **ऐका. वाचा.**

दारावरची बेल वाजली. मायाने दार उघडले. दारात पोस्टमन होता. त्याने मायाला एक पाकीट दिले. मायाने पाकिटावरील मजकूर वाचला. 'अय्या, काकांचं पत्र!' तिला आनंद झाला. 'धन्यवाद पोस्टमनकाका.' मायाने पोस्टमनचे आभार मानले. दार बंद केले.

मायाने पाकीट उघडले. आतील पत्र बाहेर काढले. पाहते तर काय! आत कोरा कागद. तिला आश्चर्य वाटले. 'काकांनी कोरा कागद कसा बरं पाठवला?' असा विचार करत माया रेश्माच्या घरी गेली. ''रेश्मा, हे बघ पत्र! काकांनी पाठवलं आहे.'' मायाने पत्र रेश्माला दाखवले. ''अगं, काकांनी कोरं पत्र पाठवलं. काहीच लिहिलं नाही त्यावर.''





रेश्माने पत्र हातात घेतले. तिला त्याचे नवल वाटले नाही. तिने एक मेणबत्ती घेतली. मेणबत्ती पेटवली आणि रेश्मा मेणबत्तीच्या ज्योतीवर पत्र धरू लागली.

''अगं रेश्मा, ते पत्र जळून जाईल,'' माया म्हणाली.

''अगं, ह्या पत्राची एक गंमत आहे. बघ तू!'' रेश्मा म्हणाली. तिने मेणबत्तीच्या ज्योतीवर ते पत्र धरले. ज्योतीची उष्णता त्या पत्राला मिळाली. त्यावर अक्षरे दिसू लागली. मायाने आनंदाने टाळ्या वाजवल्या. तिने पत्र वाचले. तिला खूप आनंद झाला. मायाने रेश्माला विचारले, ''काय गं, आता कशी काय पत्रावरची अक्षरं दिसू लागली?''

''अगं माया, ऐक. लिंबाच्या रसाचा उपयोग करून कागदावर लिहितात. लिहिलेले सुकल्यावर कागद कोरा दिसतो. तो कागद उष्णतेवर धरल्यास त्यावरील अक्षरे पुन्हा दिसू लागतात आणि आपल्याला ती अक्षरे वाचता येतात.'' रेश्माने मायाला कोऱ्या पत्राचे गुपित सांगितले. हे ऐकून माया आश्चर्यचकित झाली.

**शब्दार्थ :** **कोरा कागद** – काहीही न लिहिलेला कागद. **नवल** – आश्चर्य. **गुपित** – गुप्त गोष्ट, रहस्य.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पत्र कोणी पाठवले?

(आ) पत्र कोणाला पाठवले?

**शिक्षकांसाठी :** पाठात सुचवल्याप्रमाणे स्वतः कृती करून पाहावी. पत्र लिहिण्याचे प्रात्यक्षिक वर्गामध्ये गटागटांत करून घ्यावे. विद्यार्थ्यांकडून या पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे.

(इ) मायाला पत्र का वाचता आले नाही?

**प्र. २. कोण ते सांगा.**

(अ) कोरे पत्र पाहून आश्चर्य वाटणारी.

(आ) कोरे पत्र वाचण्याची युक्ती माहीत असणारी.

**प्र. ३. खालील शब्द असेच लिहा.**

पत्र, मित्र, सत्र, रात्र, त्रयस्थ, पात्र, त्राण, वात्रट, कंत्राट.

- **पाठातील खालील वाक्ये वाचा.**

(अ) दारावरची बेल वाजली.

(आ) 'काकांनी कोरा कागद कसा बरं पाठवला?'

(इ) रेश्माने पत्र हातात घेतले.

(ई) ''अगं, काकांनी कोरं पत्र पाठवलं.''

- **वाचा. समजून घ्या.**

(१) वाक्य पूर्ण झाल्यावर . असे चिन्ह देतात. . या चिन्हाला **पूर्णविराम** म्हणतात.

(२) वाक्यात जेव्हा प्रश्न विचारलेला असतो, तेव्हा वाक्याच्या शेवटी ? असे चिन्ह देतात. ? या चिन्हाला **प्रश्नचिन्ह** म्हणतात.

(३) वाक्य वाचताना शब्दानंतर आपण थोडे थांबतो. तसेच वाक्यात आलेल्या वस्तू/नावांची यादी वाचताना प्रत्येक शब्दानंतर आपण थोडे थांबतो, तेव्हा त्या शब्दानंतर , असे चिन्ह देतात. , या चिन्हाला **स्वल्पविराम** म्हणतात.

**वरील वाक्यांत (. , ?) ही विरामचिन्हे आलेली आहेत**

- **खालील वाक्यांत पूर्णविराम, प्रश्नचिन्ह व स्वल्पविराम घाला.**

(१) मी संगणक सुरू केला मामाचा ई-मेल वाचला मामा चार दिवसांनी येणार होता आम्ही आनंदित झालो

(२) रमेश सीता अनिता गणेश हे सर्वजण दररोज बागेत खेळतात

(३) तू जेवण केलेस का

(४) हे ऐकून तुला आनंद झाला का

(५) मी आई बाबा राजू पिंकी बाजारात गेलो

(६) सुशांत रघू राजेश हे चांगले मित्र आहेत

AVHU8Z

- **वाचा व लिहा.**

आपल्या घराभोवतीच्या परिसरात तुळस, दुर्वा, गवतीचहा, आले, लिंबू अशी अनेक औषधी झाडे असतात. झाडासारखा मित्र नाही. झाडे सावली देतात, फुले-फळे देतात, औषधे देतात. अशा शेकडो गुणकारी वनस्पती आपल्या जवळच असतात. आपण त्यांची माहिती जाणून घेतली पाहिजे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वर दिलेल्या उताऱ्याचे श्रुतलेखन करून घ्यावे. वाक्ये देऊन शिकवलेल्या विरामचिन्हांचा सराव घ्यावा.

# २१. छोटेसे बहीणभाऊ

AH6QAH

* ऐका. वाचा. म्हणा.

छोटेसे बहीणभाऊ,
उद्याला मोठाले होऊ.
उद्याच्या जगाला, उद्याच्या युगाला,
नवीन आकार देऊ.

ओसाड, उजाड जागा,
होतील सुंदर बागा,
शेतांना, मळ्यांना, फुलांना, फळांना,
नवीन बहार देऊ.

मोकळ्या आभाळी जाऊ,
मोकळ्या गळ्याने गाऊ,
निर्मळ मनाने, आनंदभराने,
आनंद देऊ अन् घेऊ.

प्रेमाने एकत्र राहू,
नवीन जीवन पाहू,
अनेक देशांचे, भाषांचे, वेशांचे,
अनेक एकच होऊ.

**– वसंत बापट**



**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. शक्य असल्यास या कवितेची ध्वनिफीत ऐकवावी. कवितेची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना म्हणायला सांगावी. नंतर स्वतःबरोबर, गटात तसेच वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात म्हणण्यास सांगावे.

# २२. वाचूया. लिहूया.

- वाचा. सांगा.



**फळ, रंग, वास, राजा, आमरस, आमराई.**

मी आहे आंबा. सगळे मला 'फळांचा राजा' म्हणतात. मी पिकलो की माझा रंग बदलतो आणि छान वास येतो. माझ्यात रस तयार होतो. माझ्या गोड रसाला आमरस म्हणतात. हापूस, पायरी, केशर, खोक्या, गोटी, चिक्कूळ्या अशी माझी काही नावे आहेत. आमराईत आंब्याची खूप झाडे असतात.

हे गाणे मिळवा. म्हणा.
**आंबा पिकतो, रस गळतो,**
**कोकणचा राजा बाई, झिम्मा खेळतो.**
तुमच्या घरी आंब्यापासून कोणकोणते पदार्थ बनवतात?



**सण, नवीन कपडे, गोडधोड पदार्थ, चर्च, सांताक्लॉज, ख्रिसमस ट्री.**

आपण अनेक सण साजरे करतो. तसेच ख्रिश्चन बांधव प्रभू येशूचा जन्मदिवस नाताळ सण म्हणून साजरा करतात. ते या सणाला नवीन कपडे घालतात. चर्चमध्ये जातात. प्रार्थना करतात. एकमेकांना शुभेच्छा देतात. शुभेच्छा देताना 'मेरी ख्रिसमस' असे म्हणतात. ख्रिसमस ट्रीवर दिव्यांच्या माळा, फुले, चांदणी यांची सुंदर सजावट करतात. आपल्या मनातील इच्छा सांताक्लॉज पूर्ण करतो, असे मुलांना वाटते. या सणाच्या दिवशी घरात डोनट, केक यांसारखे गोडधोड पदार्थ बनवले जातात. प्रभू येशूच्या शिकवणुकीनुसार ते गोरगरिबांना वाटले जातात. त्यांनाही आनंदात सहभागी करून घेतले जाते.

केक बनवण्याची कृती समजून घ्या.



**वाहन, इंधनबचत, चाके, व्यायाम.**

मला सायकल खूप आवडते. सायकल हे एक प्रवासाचे वाहन आहे. सायकलीला दोन चाके असतात. तिला इंधन लागत नाही. चाकांत हवा भरली, की ती सुसाट धावते. घरापासून जवळ कोठे जायचे असेल, तर सायकल वापरावी. त्यामुळे इंधनबचत होईल. सायकल चालवणे, हा एक चांगला व्यायाम आहे.

तुम्हांला सायकलीवर कोठे कोठे जायला आवडेल? तुम्ही तुमच्या सायकलीची काळजी कशी घेता?



**प्राणी, शेपूट, कीटक, खाणे, मानवाचे अन्न.**

मी आहे मासा. मी समुद्र, नदी, तलावांच्या पाण्यात राहतो, म्हणून मला जलचर प्राणी म्हणतात. मी शेपूट आणि परांच्या मदतीने पोहतो. पाण्यातले कीटक, लहान मासे व पाणवनस्पती खातो. माझे रंग, रूप, आकार वेगवेगळे असतात. मी मानवाचे अन्न आहे.

फिशटँकमधील मासे काय खातात? त्यांची काळजी कशी घेतात? तुम्हांला त्यातील माशांची कोणकोणती नावे माहीत आहेत, ती नावे लिहा.

• वाचा. लिहा.



**फूल, रंग, वास, राजा, उपयोग, व्यवसाय.**

गुलाबाला 'फुलांचा राजा' म्हणतात. गुलाब अनेक रंगांचे असतात.



**पक्षी, रंग, आवाज, पिसे, नाच, अन्न.**

मला मोर खूप आवडतो. तो खूप सुंदर दिसतो. त्याचा रंगीबेरंगी पिसारा पाहत राहावेसे वाटते.





तुमच्या आवडीच्या सणांविषयी चित्र, शब्द, माहिती लिहा.

**शिक्षकांसाठी :** चित्रांशी संबंधित व दिलेल्या शब्दांचा उपयोग करून चित्रांविषयी चार-पाच वाक्ये कशी लिहिली यावर चर्चा करावी. चित्रांशी संबंधित आणखी काही शब्द व वाक्ये सांगण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

# २३. प्रामाणिक इस्त्रीवाला

मी शिवानी. पाचवीत शिकते. माझे कुटुंब छोटेसेच आहे. आई, बाबा, भाऊ शिवराज आणि मी. आई घरची सगळी कामे स्वतःच करते. आम्ही तिला मदत करतो. एकदा आईने कपडे धुऊन वाळत घातले. कपडे वाळल्यानंतर भाऊने त्यांच्या घड्या करून टेबलावर ठेवले.

सायंकाळी पाच वाजता बाबा बाहेरून आले. त्यांनी आईजवळ पैसे दिले. ते तिला ठेवायला सांगितले. आई कामाच्या घाईत होती. तिने पैसे टेबलावर घड्या घातलेल्या कपड्यांत ठेवले आणि ती कामात गढून गेली.


बाबा बाहेर गेले होते. आई कामात होती. भाऊ खेळायला गेला होता. मी अभ्यास करत होते. इतक्यात आमचे इस्त्रीवाले दामूकाका आले. इस्त्रीसाठी कपडे मागू लागले. आई स्वयंपाकघरातून म्हणाली, ''अगं शिवानी, त्याला टेबलावर ठेवलेले कपडे पिशवीत भरून दे.'' मी कपडे पिशवीत भरून दिले. इस्त्रीवाले काका कपडे घेऊन निघून गेले.



दोन दिवसांनंतर बाबांनी आईकडे पैसे मागितले. नेहमीच्या सवयीप्रमाणे आई कपाटात पैसे शोधू लागली; पण पैसे काही सापडेनात. आई कावरीबावरी झाली. पैसे गेले कुठे? आई विचारात पडली. घरात सगळीकडे पैशांची शोधाशोध सुरू झाली; पण पैसे काही सापडले नाहीत.

संध्याकाळच्या वेळेला दामूकाका घरी आले, ते हाका मारतच. ''वहिनी, अहो वहिनी.'' आईबाबा बाहेर आले. ''काय रे बाबा? कपडे आणलेस का?'' जरा वैतागूनच आईने विचारले.

दामूकाकांनी खिशातून पैसे काढले. ''अहो वहिनी, तुमचे कपडे मी इस्त्रीला घेतले अन्



कपड्यांच्या घड्यांमध्ये हे पैसे सापडले. ते परत करायला आलो. पैसे मोजून घ्या आणि हे कपडेही घ्या.'' दामूकाका आईच्या हातात पैसे ठेवत म्हणाले. आईने पैसे मोजले.

''दामू, पैसे बरोबर आहेत. तुझा प्रामाणिकपणा मला आवडला.'' बाबा म्हणाले. बाबा बक्षीस म्हणून दामूकाकांना १०० रुपये देऊ लागले, तेव्हा दामूकाका म्हणाले, ''नको भाऊसाहेब, आम्ही गरीब आहोत; पण कष्टानंच कमवून खातो.'' दामूकाका जायला निघाले. आईबाबा त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे कौतुकाने पाहत राहिले.

शब्दार्थ : **कामात गढून जाणे** – कामात मग्न होणे. **कावरीबावरी होणे** – गोंधळून जाणे. **वैतागणे** – चिडणे. **पाठमोरी** – पाठीकडची बाजू.

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) पाचवीत शिकणारी.

(आ) कपड्यांच्या घड्या करणारा.

(इ) आईजवळ पैसे देणारे.

(ई) पैसे परत करणारे.

(उ) पैसे मोजून घेणारी.

(ऊ) दामूकाकांना बक्षीस देऊ करणारे.

**प्र. २. कोण, कोणास म्हणाले ते लिहा.**

(अ) ''त्याला टेबलावर ठेवलेले कपडे पिशवीत भरून दे.''

(आ) ''काय रे बाबा? कपडे आणलेस का?''

(इ) ''तुझा प्रामाणिकपणा मला आवडला.''

(ई) ''आम्ही गरीब आहोत; पण कष्टानंच कमवून खातो.''

**प्र. ३. 'प्रामाणिकपणा' यासारखे आणखी शब्द लिहा.**

**प्र. ४. गोलातील शब्द लावून नवीन शब्द लिहा.**

(वाले)

इस्त्री — **उदा.,** इस्त्रीवाले

रिक्षा — ____________

भाजी — ____________

फळ — ____________

झाडू — ____________

**प्र. ५. खालील शब्द वाचा व असेच लिहा.**

स्वयंपाकघर, इस्त्रीवाला, कावरीबावरी, प्रामाणिक, संध्याकाळ.

**प्र. ६. वाक्ये वाचा. क्रिया कोणती ते लिहा. क्रिया करणारी व्यक्ती कोण ते ओळखा. योग्य रकान्यात '✓' अशी खूण करा.**

| वाक्ये | क्रिया | क्रिया करणारी व्यक्ती | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | इतर |
| शिवानी पाचवीत शिकते. | शिकते | | ✓ | |
| आईने पैसे मोजले. | | | | |
| भाऊने कपड्यांच्या घड्या केल्या. | | | | |
| बाबांनी आईला पैसे दिले. | | | | |
| दामूकाकांनी खिशातून पैसे काढले. | | | | |
| पिलू घरट्यात बसले. | | | | |

**प्र. ७. खालील वाक्यांतील अधोरेखित नामांचे लिंग ओळखा. प्रश्न क्र. ६ प्रमाणे तक्ता तयार करून वहीत लिहा.**

(अ) काव‌ळा झाडावर राहतो.

(आ) रेश्माने पत्र वाचले.

(इ) पोस्टमनने पत्र दिले.

(ई) मायाने पाकीट उघडले.

(उ) मायाने दार उघडले.

**प्र. ८. रिकाम्या जागी योग्य नाम लिहा. वाक्यांतील क्रियापदे ओळखा.**

(१) ········· गवत खातो.

(२) ········· पत्र लिहिते.

(३) ········· पुस्तक वाचतो.

(४) ········· गवत खाते.

(५) ते ········· सुंदर आहे.

(६) ते ········· मोठे आहे.

**प्र. ९. रिकाम्या जागी योग्य क्रियापदे लिहा.**

(अ) सुधीर गोष्ट ·········.

(आ) ते झाड उंच ·········.

(इ) रोझी गाणे ·········.

(ई) ती वेल हिरवीगार ·········.

- **चौकटींत काही अक्षरे दिली आहेत. त्यापासून अर्थपूर्ण शब्द बनवा. त्या शब्दांची कार्डे तयार करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| झा | ड | वि | मा | न |
| डू | बा | ळी | क | ळ |
| पं | स | म | ड | के |
| खा | री | क | णी | स |
| क | ळ | प | तं | ग |
| पा | न | दी | गा | य |
| ट | र | बू | ज | ऊ |
| ह | वा | ध | र | स |

AHPHDX


**शिक्षकांसाठी :** स्वाध्यायातील सारणीत भाऊ, बाबा, दामू ही पुल्लिंगी नामे आहेत. शिवानी, आई ही स्त्रीलिंगी नामे आहेत. पिलू हे पुल्लिंगी नाही व स्त्रीलिंगी नाही. अशा नामाला नपुंसकलिंगी नाम म्हणतात. नामाला 'तो, ती, ते' शब्द लावूनही लिंग ओळखता येते. ही माहिती विद्यार्थ्यांना सांगावी.

# २४. ऐका. पाहा. करा.


**शिक्षक :** मुलांनो, आज आपण हत्तीचा मुखवटा कसा करायचा ते शिकणार आहोत. हत्तीचा मुखवटा तयार करण्यासाठी पुढील साहित्य हवे.

चेहऱ्याच्या आकाराची कागदाची साधी बशी (पेपरडिश). ही बशी आपल्या चेहऱ्यावर नीट बसेल अशी घ्यावी. थोडा लहान आकार असलेली दुसरी एक कागदी बशी, रंगीत कागद, साधा जाड कागद, रंग, ब्रश, पेन्सिल, ट्रेसपेपर, गोंद, जाड दोरा, सुई, इलॅस्टिक, स्टेपलर.


आता आपण मुखवटा कसा तयार करायचा ते पाहूया.




१. आपल्या चेहऱ्याच्या आकाराची साधी, स्वच्छ कागदी बशी घेऊ. तिच्या मागच्या भागावर पेन्सिलीने हत्तीचा मुखवटा काढू.




२. लहान कागदी बशीतून हत्तीच्या कानांचे दोन सारखे आकार कापून घेऊ.



३. स्टेपलरच्या मदतीने दोन्ही कान मुखवट्याला योग्य जागी जोडू.




४. एक जाड कागद घेऊन तो लांब त्रिकोणी आकारात कापून घेऊ.




५. या त्रिकोणी आकाराला खालच्या बाजूने वरपर्यंत उलट-सुलट घड्या घालू. तयार झालेली घडी उलगडू, म्हणजे हत्तीची सोंड तयार होईल.


**शिक्षकांसाठी :** ज्याप्रमाणे पेपरडिशपासून मुखवटा तयार केला, त्याप्रमाणे टाकाऊ कागदांचा वापर करून वस्तू, भेटकार्डे बनवण्यास विद्यार्थ्यांना सांगावे. मुखवटा बनवण्याची कृती विद्यार्थ्यांना वर्गात सांगायला लावावी.




६. हत्तीच्या तोंडाच्या जागी सोंड चिकटवू.



७. हत्तीचे डोळे आपल्या डोळ्यांवर येतील अशा प्रकारे कात्रीने बशीवर डोळ्यांचे आकार कापू.



८. तयार झालेला मुखवटा योग्य रंगाने रंगवू.



९. कान ज्या ठिकाणी जोडले आहेत, तिथे छिद्रे पाडून त्यांतून जाड दोरा किंवा इलॅस्टिक घालू. मुखवटा चेहऱ्यावर नीट बसेल अशा प्रकारे दोऱ्याला गाठ मारू. (इलॅस्टिक असल्यास कापून शिवावे.)




आपला हत्तीचा मुखवटा तयार झाला.

**उपक्रम :** १. हत्तीचा मुखवटा कसा तयार केला हे तुम्ही पाहिलेत. तुम्हीसुद्‌धा असा मुखवटा तयार करा. मुखवटा तयार करण्यासाठी काय काय केले ते क्रमाने वर्गात सांगा. तुम्ही मुखवटा कसा तयार केला ते मित्रांना सांगा.

२. कागदाच्या बशीपासून विविध वस्तू तयार करा.

# २५. मालतीची चतुराई

- **वाचा.**



मलण्णा शेतावरून घरी आला. त्याने दोन्ही बैलांना गोठ्यात बांधले. त्यांना चारा, पाणी दिले. हातपाय धुऊन तो घरात गेला. त्याची पत्नी मालती हिने भाजीभाकरी केली होती. दोघांनी जेवण केले. मलण्णा शेतातील कामाने खूप दमला होता. अंथरुणावर पडताच त्याला झोप लागली. सकाळी तो लवकर उठला. बाहेर आला. पाहतो तर काय! गोठ्यात एकच बैल. दुसरा बैल गायब!

''अगं गोठ्यात एकच बैल आहे. आपला दुसरा बैल कुठे गेला?'' मलण्णाने घाबरून मालतीला विचारले. मालती झटकन बाहेर आली. तिलाही या गोष्टीचे नवल वाटले.

मलण्णाने आणि मालतीने गावात बैलाचा शोध सुरू केला. गावभर शोध घेतला, पण बैल काही सापडेना. दोघेही खूप थकले. घरी आले. आता काय करावे? बैल कोठे गेला असेल? एकच बैल. शेती कशी करायची? मलण्णा डोक्याला हात लावून बसला.

तीन-चार दिवस गेले. मलण्णा मालतीला म्हणाला, ''आपण तालुक्याला जाऊ. तिथे गुरांचा बाजार भरतो. तिथून एक बैल खरेदी करू.'' मालती म्हणाली, ''खरं आहे तुमचं. एका बैलावर नांगरणी कशी करायची?''

दोघे तालुक्याला आले. गुरांचा मोठा बाजार भरला होता. बाजारात जनावरांची खरेदी-विक्री सुरू होती. आपल्या बैलाच्या जोडीला जोड असा बैल शोधत ते दोघे बाजारात फिरू लागले. तेवढ्यात



मालतीला त्यांचा हरवलेला बैल दिसला. ते दोघे झटकन बैलाजवळ पोहचले.

''हा तर आमचा बैल!'' असे म्हणत मालतीने बैलाला अंजारले गोंजारले.

''या माणसाने आमचा बैल चोरला,'' असे म्हणत तिने आरडाओरडा करायला सुरुवात केली.

बैल चोरणारा माणूस मनातून घाबरला; पण तसे न दाखवता तो मालतीशी भांडू लागला.

'तुमचा बैल मी कशाला घेऊ? हा माझाच बैल आहे. मीच याला लहानाचा मोठा केला आहे.' असा तो कांगावा करू लागला. बैलाभोवती लोकांची गर्दी जमली.

मालतीच्या लक्षात आले. हा चोर आपला बैल सहजासहजी देणार नाही. काहीतरी युक्ती केली पाहिजे. तिने झटकन बैलाच्या डोळ्यांवर हात धरला.

''सांग बरं, याचा कोणता डोळा अधू आहे, डावा की उजवा?'' मालतीने चोराला विचारले. चोर गोंधळला आणि म्हणाला, ''माझ्या बैलाचा डावा डोळा अधू आहे.''

''नक्की ना? बैलाचा डावा डोळा अधू असेल, तर हा बैल तुझा नाही तर तो माझा आहे.'' मालती म्हणाली.

चोराने थोडा विचार केला. त्याच्या मनात गोंधळ निर्माण झाला. या स्त्रीच्या बोलण्यावरून बैलाचा डावा डोळा अधू नसावा. ''नाही, नाही, माझा बैल उजव्या डोळ्यानं अधू आहे.'' चोर पटकन म्हणाला. त्याने असे म्हणताच मालतीने बैलाच्या डोळ्यांवरचा हात बाजूला केला.

''अरे चोरा, या बैलाचे दोन्ही डोळे चांगले आहेत.'' असे मालतीने म्हटल्याबरोबर चोराची भंबेरी उडाली. लोकांसमोर चोराची लबाडी उघडकीस आली. सगळ्यांनी मालतीच्या चतुराईचे कौतुक केले आणि चोराला पोलिसांच्या ताब्यात दिले. मालती आणि मलण्णा आपल्या बैलाला घेऊन आनंदाने घरी आले.

शब्दार्थ : **थकून जाणे** – खूप दमणे. **डोक्याला हात लावणे** – विचारात पडणे. **अंजारणे गोंजारणे** – प्रेमाने थोपटणे. **कांगावा करणे** – खरे बोलण्याचा आव आणणे. **सहजासहजी** – त्रास न होता. **भंबेरी उडणे** – खूप गोंधळून जाणे. **लबाडी** – खोटेपणा.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) मालतीला कोणत्या गोष्टीचे नवल वाटले?
(आ) मलण्णा डोक्याला हात लावून का बसला?
(इ) बैल चोरणारा माणूस मनातून का घाबरला?
(ई) मालतीने युक्ती करायचे का ठरवले?
(उ) मालतीने कोणती युक्ती केली?
(ऊ) चोराची भंबेरी का उडाली?

**प्र. २. रिकाम्या जागी पाठातील योग्य शब्द लिहा.**

(अ) मालती .......... बाहेर आली.
(आ) एका बैलावर .......... कशी करायची?
(इ) तेवढ्यात मालतीला त्यांचा .......... बैल दिसला.
(ई) बैलाभोवती लोकांची ........ जमली.
(उ) सगळ्यांनी मालतीच्या ........... कौतुक केले.

**प्र. ३. पटकन, झटकन यांसारखे आणखी शब्द लिहा.**

**प्र. ४. आरडाओरडा, सहजासहजी, हे जोडशब्द आलेली पाठातील वाक्ये लिहा.**

**प्र. ५. मालतीच्या चतुराईचे सर्वांनी कौतुक केले. तुमच्या/मित्राच्या/मैत्रिणीच्या चतुरपणाचे कौतुक कधी झाले आहे का? घरी व वर्गात सांगा.**

**प्र. ६. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द पाठात शोधून लिहा.**

(अ) खरेदी × (आ) लहान × (इ) डावा ×

**प्र. ७. खालील शब्द असेच लिहा.**

दोन्ही, गोष्टी, विक्री, निरीक्षण, गर्दी, स्त्री.

AX89H8

**उपक्रम :** आतापर्यंतच्या पाठांत आलेले जोडशब्द शोधा. ते 'माझा शब्दसंग्रह' वहीत लिहा.

## माझा अनुभव

एके दिवशी मी विनीताच्या घरी गेले होते. आम्ही दोघी गच्चीत गप्पा मारत बसलो. तेवढ्यात विनीताच्या आईने हाक मारली. आम्ही दोघी घरात आलो. काकू म्हणाल्या, ''इथे गप्पा मारण्यापेक्षा भाजी आणायला जा आणि जाताना गप्पा मारा.''

पिशव्या व पैसे घेऊन आम्ही दोघी भाजी आणायला निघालो. आम्हांला खूप गप्पा मारायच्या होत्या. आम्ही दोघी जवळच्याच भाजीवालीकडे गेलो. भाजी घेतली व परत निघालो. सायंकाळचे सात वाजलेले. प्रत्येकजण घरात काम करण्यात गुंतलेला. टीव्हीचा जोरजोराने आवाज येत होता. रस्त्यावर कोणीही नव्हते. कोणत्यातरी बंगल्यातील दोन मोठे कुत्रे बाहेर फिरत होते. त्या कुत्र्यांनी आम्हा दोघींना पाहिले. कमरेइतके उंच आणि खाऊनपिऊन धष्टपुष्ट झालेले ते कुत्रे आमच्या जवळ आले. अंगाला चाटू लागले. पिशवीत डोकावून पाहू लागले. आमच्या अंगाचा थरकाप झाला. घाबरून दोघींच्या हातातील पिशव्या खाली पडल्या. पिशवीतील कांदे, बटाटे, फ्लॉवर, कोबी चेंडूसारखे घरंगळत रस्त्यावर पडले. दोन्ही कुत्रे पायांनी त्यांच्याशी खेळू लागले. जणूकाही ते चेंडूशीच खेळत होते. नंतर त्यातला एक कुत्रा आमच्याजवळ आला. गुडघ्यावर दोन पाय ठेवून गुरगुर करू लागला. आमची बोलतीच बंद झाली. मोठ्याने कोणाला हाकही मारता येईना. भीतीने तोंडातून शब्दच फुटत नव्हता. ते दोन्ही कुत्रे आमच्याभोवती फिरत होते. आम्ही मदतीसाठी इकडेतिकडे पाहत होतो. तेवढ्यात मला एका बंगल्याच्या गच्चीत एक काका दिसले. त्यांचे लक्ष आमच्याकडे गेले. ते आत गेले आणि त्यांनी कुत्र्यांच्या मालकाला फोन केला.

त्या कुत्र्यांचे मालक बंगल्यातून बाहेर आले. 'तुम्हांला कुत्रे चावले वगैरे नाहीत ना ! घाबरू नका,' असे म्हणत त्यांनी दोन्ही कुत्र्यांना आत नेले आणि आमच्या जिवात जीव आला. त्यांनी आमची माफी मागितली. ज्या काकांनी आम्हांला गच्चीतून पाहिले होते, ते आमच्याजवळ येऊन चौकशी करू लागले. ''कुत्र्यांनी आम्हांला काहीही केलेलं नाही; पण कुत्रे पाहूनच आम्ही घाबरलो.'' असे त्यांना सांगून आम्ही जमेल तेवढी भाजी पिशवीत भरली आणि घरी आलो. घरी आल्यावर काकूंना हा प्रकार सांगितला. त्याही घाबरल्या.

विनीताचा भाऊ हसून म्हणाला, ''अगं, तुम्ही काय गप्पा मारता ते ऐकायला ते कुत्रे आले होते. घाबरायचं कशाला !'' अन् घरात एकच हशा पिकला.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. कोणत्याही एका परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे.

# २६. पतंग

• ऐका. वाचा.

पतंग उडवू चला,
गड्यांनो, पतंग उडवू चला.

रंग ढगांवर मावळतीचा,
लाल पिवळसर किती मजेचा,
झुळझुळ वारा नदीकाठचा,
बाजुस डोंगरमळा.

करू चला सुरवात बरोबर,
सोडा सोडा रीळ भराभर,
पतंग चढवा हे वाऱ्यावर,
ढगांस भेटायला.

मउमउ वाळुत पाय रोवुनी,
देऊ झटका दोरा ओढुनि,
पतंग जातिल वर वर चढुनी,
पंख नको त्याजला.

जशी पाखरे आभाळात,
पंख पसरुनी तरंगतात,
दिसतिल तैसे पतंग रंगित,
खेळ किती चांगला !

**– अ. ज्ञा. पुराणिक**



शब्दार्थ : **त्याजला** – त्याला. **आभाळ** – आकाश. **तरंगणे** – हवेत उडणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सूर्य मावळण्याच्या वेळेस ढगांवर कोणता रंग दिसतो?

(आ) पतंग कोणासारखे तरंगतात?

**प्र. २. विरुद्ध अर्थाचे शब्द माहीत करून घ्या. लिहा.**

(अ) चढणे ×          (ई) मऊ ×
(आ) ओढणे ×         (उ) चांगला ×
(इ) मावळणे ×        (ऊ) भराभर ×

**प्र. ३. खालील शब्दांना 'सर' शब्द जोडून नवीन शब्द तयार करा व लिहा.**

**उदा.,** पिवळा - पिवळसर.

(अ) काळा     (आ) निळा     (इ) लाल

**प्र. ४. मोकळ्या जागी कवितेतील योग्य शब्द लिहा व या कडव्याचा अर्थ समजून घ्या.**

जशी ............ आभाळात,
............ पसरुनी तरंगतात,
दिसतिल तैसे ............ रंगित,
खेळ किती ............!

**प्र. ५. तुम्हांला आवडणाऱ्या पाच खेळांची नावे सांगा.**

**प्र. ६. हे शब्द असेच लिहा.**

झुळझुळ, रीळ, पिवळसर, पतंग, रंगित.


**प्र. ७. खालील शब्द वाचा. असे आणखी शब्द लिहा.**

(अ) पळापळ, रडारड, पडापड.
(आ) मऊमऊ, वरवर, कळकळ.
(इ) रडतखडत, हसतखेळत, वाजतगाजत.

**प्र. ८. समान अक्षराने शेवट होणारे कवितेतील शब्द लिहा.**

(अ) मावळतीचा -        (इ) रोवुनी -
(आ) बरोबर -          (ई) आभाळात -

**प्र. ९. गोलातील शब्द जोडून वाक्ये बनवा.**




**उदा.,** चेंडू झेलणे.

**वाक्ये :** (१) मी चेंडू झेलतो.
(२) शिवानी चेंडू झेलते.


- **वाचा. लक्षात ठेवा.**

  घराच्या छतावर उभे राहून पतंग उडवू नका. मोकळ्या मैदानात पतंग उडवा. काटलेला पतंग पकडण्यासाठी रस्त्यावर धावू नका. अवघड ठिकाणी चढू नका.

# २७. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

AXR1KI

• ऐका. वाचा.



विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांचा जन्म जमखंडी गावी झाला.

अण्णासाहेबांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव यमुनाबाई होते.

लहानग्या विठ्ठलला खेळाची अत्यंत आवड होती. हुतुतू, खो-खो, सुरपारंब्या यांसारखे खेळ खेळण्यात लहानगा विठ्ठल सदैव पुढे असे. लहानपणीच्या या खेळांमध्ये विठ्ठलचा धीटपणा व सहनशीलता दिसून येई. त्याचे वडील धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्या धार्मिक वृत्तीचा विठ्ठलवरही परिणाम झाला होता. सर्व जातिधर्मांचे लोक त्यांच्या घरी येत असत. माणसामाणसांत भेद करणे योग्य नाही, याचा संस्कार घरातील वातावरणामुळे लहानग्या विठ्ठलच्या मनावर उमटला.

छोटा विठ्ठल अवघा चार वर्षांचा होता, त्या वेळी दक्षिण भारतात महाभयंकर दुष्काळ पडला होता; पण विठ्ठलच्या मळ्यात मक्याचे चांगले पीक आलेले होते. आजोबा बसवंतराव हे दानशूर होते. दररोज सकाळच्या वेळी आजोबा कट्ट्यावर बसून गोरगरिबांना मक्याचे दाणे वाटत असत. आजोबांना या कामी विठ्ठलही मदत करत असे. लोक विठ्ठलचे कौतुक करत व आशीर्वाद देत.

एकदा काय झाले विठ्ठल जेवायला बसला. समोर ताट होते. तेवढ्यात एक भिकारी दाराशी आला. त्या भुकेलेल्या माणसाला विठ्ठलने आपले ताट दिले. हा दयाळूपणा विठ्ठलमध्ये जन्मजातच होता.

'जे का रंजले गांजले ।  
त्यांसी म्हणे जो आपुले ।।  
तोचि साधु ओळखावा ।  
देव तेथेचि जाणावा ।।'

या संत तुकारामांच्या अभंगवाणीचा ठसा विठ्ठलच्या हृदयावर आयुष्यभर उमटला होता.

समाजसुधारणा करण्याचा अखंड ध्यास घेऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आयुष्यभर कार्य करत राहिले.

**– डॉ. भि. ना. दहातोंडे**

शब्दार्थ : **अवघा** – फक्त. **महाभयंकर** – अतिशय त्रासदायक. **दुष्काळ** – पाण्याची व अन्नधान्याची कमतरता असणे. **दानशूर** – धान्य, पैसे, कपडे मोठ्या प्रमाणात दान करणारी व्यक्ती. **कट्टा** – घरासमोरचा ओटा.

## स्वाध्याय

प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) विठ्ठलचा जन्म कोठे झाला?

(आ) विठ्ठल कोणकोणते खेळ खेळत असे?

(इ) विठ्ठलच्या आजोबांनी दुष्काळाच्या वेळी गोरगरिबांना कोणती मदत केली?

(ई) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर कोणते कार्य केले?

**प्र.२. योग्य पर्यायापुढे '✓'अशी खूण करा.**

(१) गोरगरीब लोक विठ्ठलला आशीर्वाद देत असत, कारण ......

(अ) तो वेगवेगळ्या प्रकारचे खेळ खेळत असे.

(आ) तो आजोबांबरोबर गोरगरिबांना मक्याचे दाणे वाटत असे.

(२) जेवताना एके दिवशी भिकारी दाराशी आला, तेव्हा .....

(अ) विठ्ठलने जेवणाचे ताटच त्या भुकेलेल्या माणसाला दिले.

(आ) भुकेलेल्या माणसाला निघून जायला सांगितले.

**प्र. ३. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) जन्म ×

(आ) आवड ×

**प्र. ४. कंसात दिलेल्या शब्दांचे विरुद्ध अर्थ असलेले शब्द वापरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

(अ) डोंगर पर्वतापेक्षा ........... आहे. (मोठा)

(आ) हरवलेला चेंडू सापडल्याने मला खूप ........... झाला. (दु:ख)

(इ) ससा हा प्राणी ........... असतो. (धीट)

(ई) राजूला ........... कपडे आवडत नाहीत. (सैल)

(उ) वीणा ........... चालते. (भरभर)

**प्र. ५. खालील शब्द वाचा व असेच लिहा.**

विठ्ठल, अण्णासाहेब, हुतुतू, धार्मिक, संस्कार, दुष्काळ, महर्षी, ध्यास, आयुष्यभर, हृद्य.

**प्र. ६. तुमच्या परिसरात एखादी दानशूर व्यक्ती राहते का? ती व्यक्ती संकटाच्या वेळी इतरांना कोणती मदत करते, याची माहिती मिळवा. वर्गात सांगा.**

- **खाली दिलेले वाक्य वाचा व दिलेल्या चाररेघांमध्ये वळणदार अक्षरांत लिहा.**

लहानग्या विठ्ठलला खेळाची अत्यंत आवड होती.

**शिक्षकांसाठी :** वर चाररेघांमध्ये दिलेल्या वाक्याप्रमाणे चाररेघी वहीमध्ये पाठातील मजकुराचे लेखन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे. त्याचा सराव घ्यावा. विद्यार्थी नीट लिहितात का ते पाहावे. त्यांना वळणदार अक्षरांत लिहिण्यासाठी मार्गदर्शन करावे.

# २८. फुलपाखरू आणि मधमाशी

• ऐका. वाचा.



(सकाळी बागेत एक फुलपाखरू स्वच्छंदपणे फिरत आहे. एक मधमाशी त्याच्याजवळ येते.)

**फुलपाखरू** : काय ग मधू, इतक्या घाईनं कुठे चाललीस?

**मधू** : अरे, मध गोळा करायला.

**फुलपाखरू** : थांब ना जरा. बघ आजची सकाळ किती सुंदर आहे!

**मधू** : हो रे, तिकडचं कारंजं बघ कसं थुईथुई नाचतंय.

**फुलपाखरू** : बागेतली फुलझाडं किती सुंदर दिसताहेत! फुलांचा सुवास सगळीकडे दरवळतो आहे.

**मधू** : मंद वारा सुटला आहे. कसं छान वाटतंय; पण मला थांबायला वेळ नाही.

**फुलपाखरू** : थांब थोडा वेळ. आपण या गुलाबाच्या फांदीवर बसून जरा गप्पा मारूया.

**मधू** : नको रे बाबा! इकडे तिकडे तुझ्यासारखा मजेत वेळ घालवायला मला सवड नाही. मी सकाळपासून निघाले खरी, पण मध काही गोळा करून झालेला नाही.


**फुलपाखरू** : मध गोळा करण्याचं काम कुणी दिलं तुला?

**मधू** : आमच्या राणीमाशीनं दिलं.

**फुलपाखरू** : अगं, तरीपण तुला थोडा वेळ घालवायला काय हरकत आहे?

**मधू** : तुझं मन मोडायला वाईट वाटतं मला, पण करणार काय? काम तर कुणाला चुकलेलं नाही बाबा!

**फुलपाखरू** : काय गं, एवढा मध गोळा करून तुला काय मिळणार? शेवटी ती माणसांचीच धन ना!



**मधू** : असं कसं? आम्हांलाही मध लागतोच ना! मध किती औषधी आहे आणि किती उपयोगी पडतो ते तुला माहीत आहे.

**फुलपाखरू** : हो. मधात औषधी गुण असतात, हे खरं आहे का गं?

**मधू** : अरे, मध हा औषधीच आहे.

**फुलपाखरू** : मध मला खूप आवडतो; पण माझ्याशी गप्पा मारायला तुला वेळ नाही, हे मात्र मला बिलकुल आवडत नाही.

**मधू** : कामात मग्न राहणं, यातसुद्धा आनंद असतो. तुझंच बघ ना! तुझ्यासारख्या सुंदर फुलपाखराला बघून किती आनंद

होतो! इतरांच्या डोळ्यांना तू सुख देतोस. हेही तू करत असलेलं कामंच आहे की!

**फुलपाखरू** : खरं सांगू का! तू इतरांना मोठेपणा देतेस, तोच तुझा चांगुलपणा आहे.

**मधू** : तसं नाही रे ! तुझे विचार खूप चांगले आहेत. त्यामुळे तुला सगळेच चांगले दिसतात, म्हणून तुला तुझ्यातला मोठेपणा दिसत नाही.

(असे म्हणत मधमाशी निघून गेली. फुलपाखरू तिच्याकडे पाहतच राहिले.)

**– बाळ गाडगीळ**

शब्दार्थ : **स्वच्छंदपणे** – मनात येईल तसे. **दरवळणे** – पसरणे. **मग्न असणे** – पूर्णपणे रमून जाणे.

## स्वाध्याय

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) बागेत स्वच्छंदपणे फिरणारे.
(आ) कामात मग्न असणारी.
(इ) थुईथुई नाचणारे.

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (१) | सुंदर | (अ) | मध |
| (२) | औषधी | (आ) | सुवास |
| (३) | मंद | (इ) | सकाळ |
| (४) | दरवळणारा | (ई) | वारा |

**प्र. ३. तुम्हांला काय काय पाहिल्यानंतर आनंद होतो?**

**प्र. ४. एक, मध यांसारखे पाठात आलेले शब्द लिहा. (बाराखडीतील एकही चिन्ह नसलेले शब्द.)**

**प्र. ५. खालील शब्दांना 'दार' शब्द जोडा. नवीन शब्द तयार करा.**

**उदा.**, ऐट – ऐटदार.
चमक, दुकान, माल, चोप, भाल, खास, आम, गमती, रुबाब, वजन.

**प्र. ६. खालील शब्दांना 'पणा' शब्द जोडून नवीन शब्द बनले आहेत. वाचा. शब्द वापरून वाक्ये लिहा.**

चांगुलपणा, मोठेपणा, लहानपणा, वेगळेपणा, मोकळेपणा, सोपेपणा, कठीणपणा.

AXZHH6

उपक्रम : १. फुलपाखरांविषयीच्या कविता मिळवा. वर्गात म्हणून दाखवा.
२. फुलपाखरांची चित्रे मिळवा. वहीत चिकटवा.

- **वाचा. लक्षात ठेवा.**
  फुलपाखरे नाजूक असतात. त्यांना पकडू नका. इजा करू नका.

**ओळखा पाहू!**
उंचाडी मान, फताडे पाय,
वाळवंटात डुगडुग जाय.

* कुंडीवरील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द पानांवर आहेत. योग्य जोड्या जुळवा व लिहा.




* खालील दोन फुलांवरील शब्दांचे मिळून योग्य जोडशब्द तयार करा व पिशवीवर लिहा.

**उदा., गोरगरीब.**




* खाली दिलेले पाठ क्र. १ ते १५ मधील नवीन शब्द व त्यांचे अर्थ वाचा. याचप्रमाणे इतर पाठांतील नव्याने परिचित झालेल्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन तुमचा शब्दसंग्रह तयार करा.

| शब्दार्थ |
|---|
| **दूर** – लांब. |
| **निरखून पाहणे** – लक्षपूर्वक पाहणे. |
| **मोहक** – सुंदर |
| **तुडुंब भरणे** – काठोकाठ भरणे. |
| **जाहली** – झाली. |
| **आणिक** – आणि. |
| **बटबटीत** – मोठाले, विद्रूप. |
| **ध्यान** – विशिष्ट रूप. |
| **गाठणे** – पोहचणे. |
| **अपुला** – आपला, स्वतःचा. |
| **कांती** – तेज. |
| **प्रभातकाळ** – पहाट, सूर्योदयाचा काळ. |
| **संध्यासमयी** – संध्याकाळी. |
| **न्हाऊ घालणे** – अंघोळ घालणे. |
| **झूल** – बैलांच्या अंगावर टाकण्यात येणारे रंगीत व नक्षीदार कापड. |
| **बाशिंग** – बैलांच्या डोक्याला बांधण्याचे आभूषण. |

| शब्दार्थ |
|---|
| **दिन** – दिवस. |
| **धाड्धाड् आपटणे** – जोरजोरात आदळणे. |
| **पाऊस धोऽ धोऽ कोसळणे** – खूप जोराचा पाऊस पडणे. |
| **गुणगुणणे** – हळू आवाजात गाणे. |
| **पानांआड** – पानांमागे. |
| **बिलगणे** – प्रेमाने मिठी मारणे. |
| **मंजूळ** – ऐकायला गोड. |
| **तीर** – काठ. |
| **लता** – वेल. |
| **वृक्ष** – झाड. |
| **सुमन** – फूल. |
| **लव्हाळी** – पाण्यात किंवा पाण्याजवळ वाढणारी एक वनस्पती. |
| **आम्रतरू** – आंब्याचे झाड. |
| **शीतल** – थंड. |
| **घट** – मातीचा घडा (माठ). |









महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी सुलभभारती इयत्ता पाचवी

₹ २५.००